५६
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २०६८



REFBK-00088

# नवें दर्शन

निबंध

७५३९८
१८।३।७१
२०६४

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संमृद्धी योजना
१९७०

# नवें दर्शन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वकमा
नमुख्य... ५५३८८ ... दि: ...११९५८
... २०६६ ... ९८/३/६७

'अमेरिकेचे एक श्रेष्ठ नागरिक' बर्नार्ड एम्. बारुच यांनीं प्रभावीपणें केलेलें लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वज्ञानाचें मर्मग्राही निवेदन.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
८८६९
REFBK-0008869

मूल्य दीड रुपया

प्रथमावृत्ति १९५६

Published by the permission of the copyright owner.

Marathi Translation of 'Philosophy for our Time' by Bernard M. Baruch.
Printed by : C. G. Vaze, Sadhana Press, 374 Shanwar, Poona 2.
Published by : K. V. Kothavale, for Majestic Book Stall, Girgaum Naka, Bombay 4.

# लेखकाविषयीं

बर्नार्ड एम्. बारुच यांचा जन्म १८७० मध्यें झाला. बेल वुल्फ व डॉ. सायमन बारुच यांचे ते चिरंजीव होत. डॉ. सायमन बारुच हे सर्जन होते. कॉलेज ऑफ दि सिटी ऑफ न्यूयॉर्क मधून ते १८८९ मध्यें पदवीधर होऊन बाहेर पडले. न्यूयॉर्क सिटी स्टॉक एक्स्चेंजचे ते अनेक वर्षें सभासद होते. १९१६ मध्यें राष्ट्रीय संरक्षण सल्लागार मंडळावर एक सभासद म्हणून त्यांची अध्यक्ष वुड्रो विल्सन यांनीं नेमणूक केली. त्यानंतर युद्धोपयोगी उद्योगधंदे मंडळावर अध्यक्ष म्हणून त्यांना नेमण्यांत आलें. तेव्हांपासून युद्धकालीन व शांतता-कालीन आर्थिक प्रश्नांबाबतचे एक उच्च दर्जाचे तज्ज्ञ म्हणून त्यांनीं अमेरिकेची सेवा केली आहे. संयुक्त राष्ट्रांच्या अणुशक्ति मंडळावर अमेरिकेचे प्रतिनिधि म्हणून अध्यक्ष ट्रुमन यांनीं त्यांची १९४६ मध्यें नेमणूक केली होती. अणुशक्तीच्या आंतरराष्ट्रीय नियंत्रणाची प्रसिद्ध ‘बारुच योजना’ त्यांनींच आंखली. अनेक अध्यक्ष व पंतप्रधान यांचे मित्र व सल्लागार म्हणून त्यांनीं काम केलें आहे. “ ह्या प्रक्षुब्ध काल-खंडांतले अमेरिकेचे एक श्रेष्ठ दर्जाचे नागरिक ” ह्या शब्दांत विन्स्टन चर्चिल यांनीं त्यांची थोरवी वर्णन केली आहे.

* * *

# ओळख

सिटी कॉलेज ऑफ न्यूयॉर्कचे ५० हजार माजी विद्यार्थी आज विद्यमान आहेत. त्यांतच कॉलेजला ज्यांचा रास्त अभिमान वाटतो, असे अनेक नामांकित लोक आहेत. मानवी व्यवहाराचें असें एकहि क्षेत्र नाहीं कीं, जें या कॉलेजच्या ‘ कणखर पुत्रां ’नीं समृद्ध व सामर्थ्यवान् केलें नाहीं.

ह्यांपैकीं एका सुपुत्राला उद्योगधंदे आणि राज्यशासन या दोन्ही क्षेत्रांत बहुमोल कामगिरी करण्याची संधि मिळाली. या सिटी कॉलेजच्या स्कूल ऑफ बिझिनेस ॲण्ड पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशनला त्यांचेंच नांव मिळावें, हें अपरिहार्य होय.

जे लोक गरिबींतून वर आलेले असतात, ते आपली गरिबीची परिस्थिति विसरून जातात किंवा आपण अप्रसिद्ध होतों वा गरीब होतों याबद्दल त्यांना खंत वाटते; लाज वाटते. ज्या शिडीचा आधार घेऊन ते वर चढलेले असतात तिचाच ते धिक्कार करतात. प्रौढपणीं गाजविलेल्या कर्तबगारीवर जोर देतात, पण तारुण्यांत मिळालेल्या संधीला कमी लेखतात. बर्नार्ड एम्. बारुच मात्र यांपैकीं नाहींत. न्यूयॉर्क शहराच्या सार्वजनिक शाळांचे व कॉलेजचे ते विद्यार्थी होते. आपल्या नागरिक बंधूंविषयींचें आपलें ऋण फारच मोठें आहे आणि सिटी कॉलेजबद्दलची कृतज्ञताहि मोठी आहे, हें आपल्या दीर्घ जीवनांत त्यांनीं वारंवार सांगितलेलें आहे.

तेव्हां आपल्या कार्यमग्न जीवनांतील अनुभवांत आपल्या कॉलेजच्या विद्यार्थ्यांना सहभागी करण्याची त्यांना इच्छा व्हावी, हें साहजिकच आहे. पुढील भाषणांतील साधेपणामुळें कोणीहि फसणार नाहीं. अमेरिकेच्या स्वतंत्र जीवनानें त्यांचें व्यक्तित्व घडवलें आहे. आणि त्यांनीं त्या जीवनाला महत्त्वाचें वळण लावलें आहे. आजच्या त्रस्त

जगांत आजच्या काळाला समजेल अशा भाषेंत ते लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वज्ञानाचा पुनरुच्चार करीत आहेत, ही गोष्ट अगदीं सामान्य वाचकाच्याहि लक्षांत आल्याशिवाय राहणार नाहीं.

त्यांच्या भाषणाचें हें मुद्रित प्रतिवृत्त आहे. तें सादर करतांना त्यांच्या प्रत्यक्ष भाषणाच्या वेळीं त्यांच्या सांगण्यावरून त्यांची मीं ज्या शब्दांत ओळख करून दिली तेच शब्द मी इथें वापरतों : "अमेरिकेच्या अध्यक्षांचे सल्लागार मुत्सद्दी वगैरे ठराविक विशेषणें न लावतां 'बर्नार्ड एम्. बारुच, सिटी कॉलेज ऑफ न्यूयॉर्क' एवढेंच मी म्हणतों." त्यांना तेवढीच ओळख फार महत्त्वाची वाटते.

**बुअेल जी. गाल्लाघर,**
अध्यक्ष,
दि सिटी कॉलेज ऑफ न्यूयॉर्क

## प्रस्तावना

सिटी कॉलेजच्या बर्नार्ड एम्. बारुच स्कूल ऑफ बिझिनेस ॲण्ड पब्लिक ॲड्मिनिस्ट्रेशनच्या विद्यार्थ्यांपुढें मि. बारुच यांनीं ता. ३, ११, १७ मे १९५४ रोजीं भाषणें केलीं तीं ह्या पुस्तकाचीं पहिलीं तीन प्रकरणें म्हणून पुस्तकरूपानें छापलीं आहेत. व्यापार, उद्योगधंदे, राज्यशास्त्र या क्षेत्रांतील नामवंत व्यक्तींकडून या संस्थेंत बारुच यांच्या नांवें एक व्याख्यानमाला दरवर्षी गुंफली जावयाची असून, या व्याख्यानमालेचें उद्घाटन करतांना बारुच यांनीं हीं तीन भाषणें केलीं.

ह्या संस्थेला बारुच यांचें नांव देण्याचा समारंभ ता. ८ ऑक्टोबर १९५३ रोजीं झाला. त्या प्रसंगीं माजी विद्यार्थी, विद्यमान विद्यार्थी, शिक्षकवर्ग व प्रतिष्ठित नागरिक असा श्रोतृसमाज होता. या संग्रहांतील चौथें प्रकरण हें बारुच यांनीं ह्या प्रसंगीं दिलेलें व्याख्यान आहे.

मि. बारुच यांनीं हीं व्याख्यानें मुख्यतः विद्यार्थ्यांसाठीं दिलीं असलीं तरी वस्तुतः तीं सर्वांसाठीं आहेत. पन्नास वर्षांच्या काळांत त्यांनीं विविध प्रकारचे अनुभव मिळविले, त्यांचा अर्क ह्यांत उतरला आहे. त्यांतूनच प्रस्तुत कालांतल्या मूलभूत प्रश्नांविषयीं एक विधायक दृष्टिकोन निर्माण झाला आहे. ज्या सनातन सत्यांवर श्रेष्ठ पुरुषांची श्रद्धा होती आणि ज्यांचा त्यांनीं उपदेश केला, तींच त्यांनीं या भाषणांत प्रतिपादिलीं आहेत. स्वतंत्र मानव म्हणून आपण जें स्वातंत्र्य भोगतों, त्या स्वातंत्र्याचा हें सत्यच आधार आहे. आत्मज्ञान करून घ्या हें तत्त्व सॉक्रेटीसच्या काळाइतकें जुनें आहे. वस्तुस्थितीबद्दलचा आदर, सारासार विचाराचें सामर्थ्य, संशोधनाची तळमळ, नैतिक मूल्यांचें श्रेष्ठत्व, शिस्तींतून निर्माण होणारें स्वातंत्र्य आणि व्यक्तीची प्रतिष्ठा व योग्यता यांची जाणीव या भाषणांत होते व त्यांचें महत्त्व कालातीत आहे. अमेरिका व अमेरिकन लोक यांच्यासंबंधीं

मि. बारुचना गाढ प्रेम आहे; व त्यांच्या उज्ज्वल भवितव्यावर त्यांचा जसा विश्वास आहे त्याचप्रमाणें त्याबद्दल त्यांना अभिमानहि आहे. आणि याचमुळें "सर्व मानवजातीचीं शुभ स्वप्नें स्पष्ट करणारा गृहस्थ" असें वर्णन या संस्थेच्या वार्षिक नियतकालिकाच्या, "Laxicon" च्या, संपादकांनीं केलें आहे.

युद्ध वा शांतता, समृद्धि वा मंदी, स्वातंत्र्य वा गुलामगिरी ह्यांसंबंधींचीं त्यांचीं पुस्तकें वाचा आणि एकदां वाचल्यानंतर पुन्हा वाचा. कारण मि. बारुच यांचें वक्तव्य समजलें म्हणजे मग या पर्यायां-पैकीं पहिला पर्याय आपण सहज पदरांत पाडून घेऊं शकूं.

**थॉमस्. एल्. नॉर्टन,**
डीन्, बर्नार्ड एम्. बारुच स्कूल ऑफ बिझिनेस
ॲण्ड पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन, सिटी कॉलेज ऑफ न्यूयॉर्क.

# आपल्या काळांतील प्रभावी इच्छा

मी माझ्या दीर्घ जीवनांत जें कांहीं शिकलों, त्यासंबंधीं भाषण करण्याची सूचना बऱ्याच महिन्यांपूर्वीं डीन नॉर्टन व डॉ. गालाघर यांनीं मला केली होती. मी त्यांना त्या वेळेला असें म्हणालों कीं, "मी न्यूयॉर्कच्या सिटी कॉलेजांत विद्यार्थी म्हणून असतांना तिथें जे कोणी वक्ते येत त्यांच्या भाषणाकडे मीं कधींच विशेष लक्ष दिलें नव्हतें; मग माझ्या भाषणाचा तरी उपयोग काय? पण त्याचा कांहीं उपयोग आहे असें जर तुम्हांला वाटत असेल तर भाषण करण्याचा मी प्रयत्न करीन."

संभाव्य युद्ध व आर्थिक मंदी या दोन संकटांबद्दल सर्वत्र बरीच काळजी व्यक्त केली जात आहे. अशा या परिस्थितीपेक्षां कमी त्रासदायक परिस्थितींत भाषण करणें मला अधिक आवडलें असतें.

आर्थिक मंदीला प्रतिबंध करणें हें सरकारचें कर्तव्य आहे, अशी समजूत आजकाल रूढ झाली आहे. मंदी हें एक अनिवार्य संकट आहे. आणि त्याला त्याचा मार्ग तसाच आक्रमूं देणें इष्ट आहे, अशी पूर्वींची समजूत होती. आतांची वृत्ति त्यापेक्षां पूर्णतः निराळी आहे.

'आपण कांहींहि करूं शकत नाहीं' हें न-कर्तेपणाचें जुनें तत्त्वज्ञान मला कधींच पटलें नाहीं. कशाच्याहि पुढें माणसानें मुकाट्यानें शरणागति पत्करावी असें मला कधीं वाटलें नाहीं. मग तो पूर असो, किंवा आग, दुष्काळ, रोग, अवर्षण, भूकंप असें कांहींहि असो; किंवा मनुष्याच्या मूर्खपणाचीं फळें असोत. माणसाचा सर्वांत मोठा मूर्खपणा म्हणजे युद्ध. पण त्यापुढेंहि कांहीं इलाज नाहीं, असें मला कधीं वाटलें नाहीं.

परंतु त्याचबरोबर आर्थिक वा नैसर्गिक नियमांकडे दुर्लक्ष करणें शक्य नाहीं व दुर्लक्ष केलें तर त्याची किंमत द्यावी लागते असेंहि मला वाटतें.

कोणत्याहि अतिरेकाचे परिणाम हे होतातच. कोणत्याहि बाबतींत आपण

अतिरेक केला, मर्यादातिक्रम केला, तर कोणत्या ना कोणत्या प्रकारें त्याची भरपाई करावीच लागते; फेरजुळणी करावीच लागते. आपण कांहीं वेळां इतकें ताणतों कीं, त्यामुळेंच अखेरीस सर्व तुटून जातें. मग त्याची भरपाई करण्यांत कांहीं काळ घालवावा लागतो. आणि वास्तविक हें सर्व टाळणें सहज शक्य असतें.

गेल्या युद्धाची व त्याच्या परिणामांची किंमत किती जबरदस्त पडली आहे याचा विचार करा. आणि अजूनहि ही किंमत देण्याचें थांबलेलें नाहीं; थांबण्याचें चिन्हहि दिसत नाहीं. त्या मानानें हिटलरला प्रतिबंध करणें किती सोपें झालें असतें, ह्याचा विचार करा. वेळेवरच जर उपाययोजना केली नाहीं तर नंतर अधिक दुःखदायक व कडक उपाययोजना करावी लागते.

कोणाला हें अगदीं प्राथमिक स्वरूपाचें सत्य वाटेल. पण त्याची किती थोडी दखल घेतली जाते !

गेल्या कांहीं वर्षांत आपण चलनवाढीचा खेळ वारंवार खेळलों आहोंत. लहान मुलें एकावर एक ठोकळे रचतात; ते कांहीं फार काळ टिकाव धरूं शकणार नाहींत व लवकरच तो डोलारा कोसळेल हें त्यांना माहीत असतें; आणि तरीहि तीं ठोकळे रचीत जातात. तसेंच आपण चलनवाढीच्या बाबतींत वागलों. शांतता स्थापन करण्याच्या प्रयत्नांतहि आपण असेच प्रवाहपतित झालों आहोंत. काय करावयाचें तेंच आपणांला कळत नाहीं. कोणताहि निर्णय आपणांला करतां येत नाहीं; किंवा भावी काळांत शांतता स्थापित होण्याला अनुकूल परिस्थिति निर्माण करण्यासाठीं आपण आपली शक्तिहि संघटित करूं शकत नाहीं.

इंडोचीनचें युद्ध आपण सात वर्षें चालू दिलें आणि मग एकाएकीं निर्वाणीला आल्याप्रमाणें आपल्याला वागणें भाग पडलें. तिथें कशाची उणीव होती ? आणि या सात वर्षांच्या काळांत आपण वा आपले दोस्त ही उणीव कां भरून काढूं शकलों नाहीं ?

एकदां एक टोक तर दुसऱ्या वेळेला दुसरें टोक गांठण्याची माणसाची पूर्वापारची वृत्ति आहे. माणसाच्या या वृत्तीमुळेंच बहुधा तो वेळेवर आवश्यक ते उपाय योजीत नसावा. तत्त्वज्ञानाच्या आणि कलेच्या क्षेत्रांतहि

अशींच आंदोलनें झालेलीं आपण पाहतों. धार्मिक श्रद्धा व अश्रद्धा, अद्भुतप्रियता व वास्तववाद, कमालीचा आशावाद व तितकाच कमालीचा निराशावाद अशा प्रकारचीं आंदोलनें होत आलीं आहेत, असे परस्परविरोधी कालखंड आपण पाहिले आहेत.

सरकारी शासनाच्या बाबतींतहि एका टोकाला सर्वंकष नियंत्रण असें आपण मानलें आहे, तर दुसऱ्या टोकाला जाऊन कशावरच नियंत्रण असूं नये असेंहि आपण म्हटलें आहे.

एखाद्या वर्षीं आपण प्रचंड प्रमाणावर शस्त्रास्त्रनिर्मिति करण्यासाठीं अब्जावधि डॉलर्स खर्च करतों. आणि मग एकदम शस्त्रास्त्रें फेकून देतों ; व १९४५ मध्यें केली त्याचप्रमाणें सैन्यकपात करतों, आणि सैरावैरा धावूं लागतों.

एकदां एक व नंतर दुसरा झटका यावयाचा, आधीं थंडी व मग ताप यावयाचा हा प्रकार शतकानुशतकें चालत आला आहे. सरासरीनें पाहतां या विविध अवस्थांतून माणसाचा दर्जा सुधारत गेलेला दिसतो. युद्ध आणि शांतता, दिवाळखोरी आणि सुबत्ता, गुलामगिरी आणि स्वातंत्र्य यांची ही प्रक्रिया चांगलीच क्लेशमय ठरली आहे. ह्या चक्रनेमिक्रमानें कांहीं वेळां सबंधच्या सबंध समाज आणि संस्कृति रसातळाला गेलेल्या आढळतील. परंतु त्याचबरोबर हेंहि खरें आहे कीं, नाशानंतर प्रत्येक वेळीं पुनर्रचनेचा काळ आला आहे. त्या काळांत निदान भौतिक दृष्ट्या तरी मानवानें नवीं, अधिक उंच शिखरें गांठलीं आहेत. त्या प्रमाणांत जर आपली आध्यात्मिक प्रगतीहि झाली असती, तर किती चांगलें झालें असतें !

ह्या उंचसखल मार्गानें झालेल्या एकूण प्रगतीमुळें तत्त्वज्ञांना समाधान वाटेल कदाचित्. पण आपल्यासारखीं जीं सर्वसाधारण माणसें आहेत त्यांना त्यांत फारसें समाधान वाटणार नाहीं. कारण ह्यापुढें तसेंच एखादें प्रचंड संकट आलें तर मानवी संस्कृतीचा निभाव लागेल कीं नाहीं ह्याची जबरदस्त शंका आहे.

नव्या संहारक शस्त्रास्त्रांमुळें पुढील युद्धाची कल्पनाहि भयानक वाटते.

मोठमोठ्या शहरांच्या पोळ्यांत मधमाश्यांप्रमाणें आपण दाटीवाटीनें राहत असतों. आपण अतिशय परस्परावलंबी बनलों आहोंत. म्हणूनच १९२९ मध्यें आली त्याप्रमाणें आपली आर्थिक यंत्रणा मोडकळीला आली तर कोणते सामाजिक उत्पात होतील, याची कल्पनाहि मनाला थरकांप आणते.

बोटांचे ठसे, कोणी खोटें बोलत आहे कीं काय हें तपासणारीं यंत्रें, बौद्धिक शुद्धीकरण, कोंडून ठार मारण्यासाठीं गॅसच्या खोल्या इत्यादि अत्यंत प्रभावी साधनें लोकांना गुलाम बनविण्यासाठीं उपलब्ध झालीं आहेत. आणि म्हणूनच ज्यामुळें द्वेषानें भारलेल्या लोकांच्या हातीं हीं साधनें जातील अशा कोणत्याहि राजकीय स्थित्यंतराचा विचारहि आपणांस सहन होत नाहीं.

आपण कुठेंहि पाहिलें तरी अशा प्रकारची पेंचप्रसंगासंबधींची भीतिच दिसून येते. मानवी इतिहासाचें आजपर्यंतचें वैशिष्ट्य म्हणजे मधून मधून येणारे हे परस्परविरुद्ध झटके होत. ह्या झटक्यांतून कायमचें मुक्त व्हावें हीच ह्या काळाची जबर इच्छा आहे. एकदां नाश व नंतर पुन्हा पुनर्रचना अशा प्रकारच्या ह्या चक्राच्या ऐवजीं जीमुळें सतत प्रगति करतां येईल, अशी एखादी पद्धति आपल्याला शोधून काढतां येईल काय ?

हें आपल्या काळाचें आव्हान आहे.

हा आपल्या काळांतला पेंचप्रसंग आहे.

* २ *

मला तरी निदान असें वाटतें कीं, नाश आणि पुनर्रचना ह्यांच्या चक्रांत आपण कायमचें गुरफटून राहिलें पाहिजे असें नाहीं.

हें कल्पनेचें राज्य आहे असें कोणी म्हणतील. मी त्याबद्दल बोलत नाहीं. तें फार लांब आहे. आपल्या आटोक्याबाहेर आहे. आदाम आणि ईव्ह ज्याप्रमाणें ईडनमध्यें नंदनवनांत रहात होतीं, त्याप्रकारेंच आदर्श राज्य जरी आज या भूतलावर स्थापन झालें तरी असूयारूपी सर्प किंवा एखादा शास्त्रीय संशोधक उद्यां आपणांत असंतोषाचें विष भिनवील.

परंतु माझी अशी श्रद्धा आहे कीं, आपली बुद्धि व अनुभव यांचा योग्य तो उपयोग आपण केला, तर मानवाच्या कारभारांत जे उत्पात होतात, ते कमी तीव्र होतील. चढ व उतार सौम्य प्रकारचे होतील. आर्थिक मंदीची दरी बुजवतां येईल आणि चलनवाढीचे डोंगर सपाट करतां येतील. जगाचा जो भाग अजून स्वतंत्र आहे, तो आपण समर्थ बनवावा आणि

शांततामय मार्गानें किती रचनात्मक कार्य करतां येतें, हें गुलामगिरीचा पडदा जेथें निर्माण झाला आहे तिथल्या लोकांनाहि दाखवूं शकलों, तर आक्रमणाचा धोका पुष्कळच कमी होईल. पलट न खातां आपण प्रगति करूं शकूं. हें होणार कसें ?

जगाचा उद्धार करण्यासाठीं सात कलमी किंवा दहा कलमी कार्यक्रम तयार करणें, हा कांहीं यावर उपाय नव्हे.

जागतिक स्थैर्य निर्माण करण्यासाठीं मानासिक स्थैर्य कसें निर्माण होईल, याचा आपण शोध घेतला पाहिजे.

हा शोध करीत असतां एक शाश्वत स्वरूपाचें तत्त्व आपण लक्षांत ठेवलें पाहिजे व त्यापासूनच कार्याला सुरुवात केली पाहिजे. हें तत्त्व पुढील प्रकारें स्पष्ट करणें शक्य आहे : विश्वाचे आणि मानवाचे व्यवहार ज्या नैसर्गिक नियमांनुसार चालतात, ते आपण समजून घेतले पाहिजेत आणि आपल्याला उपकारक ठरतील अशा रीतीनें ते जुळवून घेतले पाहिजेत. जिथें तसें करतां येत नसेल, तिथें आपण आपल्याला त्या नियमांशीं जुळवून घेतलें पाहिजे.

रानटी लोक आकाशांतल्या विजेला भिऊन थरकांपत. आपण तिला आपली दासी केली आहे. पाण्यावरून चालणें शक्य नाहीं असें जेव्हां माणसानें पाहिलें तेव्हां पाण्यावर तरंगण्यासंबंधींचे नैसर्गिक नियम दुर्लंघनीय म्हणून त्यानें उपेक्षिले नाहींत. त्यानें त्या नियमांनुसार जहाजें तयार केलीं. मानवजात नष्ट होण्याचा धोका ज्या जंतूंमुळें निर्माण झाला होता, त्यांच्याचपासून जंतुनाशक द्रव्यें निर्माण करण्यांत आलीं. केवळ रोगी माणसांवर औषधोपचार करूनच न थांबतां रोगाला प्रतिबंध करण्याच्या दिशेनें वैद्यकशास्त्राची प्रगति होत आहे, याबद्दल मला आनंद होतो.

जगांत मोकाट सुटलेल्या शक्तीपुढें घाबरून त्यांना शरण जाणारीं कांहीं माणसें प्रत्येक काळांत होतीं, पण त्याचबरोबर या शक्तींच्या विरुद्ध बंड करणारींहि माणसें होतीं. तथापि त्यांपैकीं कोणा एका गटामुळें प्रगति साध्य झाली, असें मात्र नाहीं. ज्यांनीं ह्या शक्ति नियंत्रित करणारे नियम लक्षांत घेतले आणि आपल्या गरजेनुसार त्यांचा उपयोग करून घेतला, त्यांच्यामुळें खरोखर प्रगति झाली आहे.

मूक शरणागति आणि आंधळी बंडखोरी हीं दोन्ही टाळणारा विवेकाधिष्ठित मार्ग शोधणें हें माझ्या विचारसरणीचें, तत्त्वज्ञानाचें मुख्य सूत्र आहे. या तत्त्वावर माझा विश्वास आहे.

हें तत्त्वज्ञान कोणत्याहि गोष्टींत बदल करण्यास विरोध करीत नाहीं; त्याचप्रमाणें केवळ बदलासाठीं बदल पत्करीत नाहीं.

मानवी जीवनाच्या मूलभूत नियमांशीं हे बदल सुसंगत होतील, त्यांचा लहरीपणा कमी होईल आणि ते अधिक फलप्रद होतील, अशा रीतीनें त्यांना वळण लावणें आणि त्यांचें नियंत्रण करणें हें ह्या तत्त्वज्ञानाचें कार्य आहे.

हें तत्त्वज्ञान भूतकाळाला चिकटून बसत नाहीं, त्याचप्रमाणें त्याची उपेक्षाहि करीत नाहीं. भविष्यकाळासाठीं भूतकालांतल्या कोणत्या गोष्टीचा उपयोग करतां येईल, हें पाहण्यासाठीं तें भूतकाळाचा अभ्यास करतें. तसेंच दुसऱ्यांच्या जुन्या चुकांची पुनरावृत्ति न करतां त्या चुकांपासून योग्य तो बोधहि घेण्यास तें शिकवितें.

रसायनशास्त्र, पदार्थ-विज्ञानशास्त्र, खगोलशास्त्र व वैद्यकशास्त्र इत्यादि क्षेत्रांत या तत्त्वज्ञानाची अंमलबजावणी करण्यांत मानवाला जितकें यश मिळालें आहे तितकें तें अर्थशास्त्र, राज्यशासन व इतर मानवी संबंध ह्या क्षेत्रांत मिळालें नाहीं. अर्थात् कांहीं लोकांचें असें मत आहे कीं, मानवी व्यवहार नियंत्रित करणारे असे नैसर्गिक नियम नाहींत. मानवी समाज हा कसा तरी एकत्र झाला आहे. तसा तो होण्यामागें कांहीं कारणपरंपरा किंवा शिस्त नाहीं. तसेंच त्यामागें आंतरिक अशीं कांहीं नैतिक, राजकीय वा आर्थिक मूल्यें असतील, असेंहि त्यांना वाटत नाहीं. त्यांना असें वाटतें कीं, राज्यकर्त्यांनीं बनविलेले कायदे हेच काय ते मानवी समाजाचें नियंत्रण करीत असतात.

मला हें तत्त्वज्ञान पटत नाहीं. माझे वडील डॉक्टर होते. ते म्हणत, " असाध्य असे कोणतेच रोग नाहींत. तर मानवाला अजून ज्यांवर इलाज सांपडला नाहीं असे कांहीं रोग आहेत, एवढेंच. "

याच मनोवृत्तीमुळें माझी अशी श्रद्धा बनली आहे कीं, पदार्थविज्ञानशास्त्रांत ज्याप्रमाणें वस्तूंचे कांहीं स्वाभाविक गुणधर्म असतात त्याचप्रमाणें मानवी

व्यवहाराचेहि कांहीं गुणधर्म असतात. आपल्याला अनेक बाबतींतील हे गुणधर्म जाणतां आले नसतील, पण मानवी व्यवहाराचें नियमन करणारे नियम आहेत आणि अधिक खोलवर पाहतां आलें तर ते आपल्याला दिसतीलहि.

तथापि जरी आपणांला हें सत्य जाणवलें तरी आपण अनेकदां त्यांची उपेक्षा करतों का? एकतर स्वार्थ किंवा द्वेष ह्यांच्या पायीं किंवा सद्यः-कालीन अप्रिय गोष्टींशीं मुकाबला करण्यासाठीं जी शिस्त लावून घ्यावी लागते ती लावून घेण्यासंबंधीं आपण अनुत्सुक असतों. म्हणून या उपेक्षेची भरपाई करण्यासाठीं अखेरीस आपल्याला फार मोठ्या प्रमाणावर त्याग करावा लागतो.

मानवी व्यवहाराच्या विशेष महत्त्वाच्या अशा कांहीं क्षेत्रांत हे नैसर्गिक नियम ज्या प्रकारें लागू पडतात ते समजावून घेण्याच्या मार्गांत अनेक अडथळे येतात. ते दूर करावे अशी माझी इच्छा आहे व या भाषणांत तोच प्रयत्न मी करणार आहें. त्यानंतर चलनवाढ आणि मंदी-तेजी आणि मंदी यांच्या संबंधाविषयीं मी चर्चा करीन. तसेंच आपल्या जीवनांत सरकारचा संबंध कसा व कोठें येतो, त्याचें स्थान काय आणि यामुळें आपणांपुढें कोणती समस्या उभी राहिली आहे, याचाहि मी ऊहापोह करीन.

आपणांपुढें जी सर्वांत गंभीर समस्या आहे ती म्हणजे अणुशक्तीची होय. तिच्या बाबतींत नैसर्गिक नियम कसे लागू पडतात, तें मी आतां दाखवून देतों.

* २ *

संयुक्त राष्ट्रांच्या अणुशक्ति मंडळावरील अमेरिकेचा प्रतिनिधि या नात्यानें अणुशक्तीच्या आंतरराष्ट्रीय नियंत्रणाची योजना तयार करण्याची जबाबदारी माझ्यावर टाकण्यांत आली, तेव्हां या बाबतींत कांहींहि करणें शक्य नाहीं, अशीच अनेकांची भावना असल्याचें मला आढळून आलें. अणुशक्तीचें फळ खाण्यासाठीं माणसानें त्याचा तुकडा तोडला खरा, पण धडपणें चावतांहि येणार नाहीं एवढा मोठा तुकडा त्यानें तोडला, असेंच अनेकांना वाटत होतें.

अणुबॉम्बचा शोध लागलाच नसता तर बरें झालें असतें असें वाटून दुसऱ्या कांहींनीं इतिहासाचीं चक्रें मागें फिरविण्याची सूचना केली. अणु-

बॉम्बचा वापर बेकायदा ठरवावा, अशी त्यांनीं खास मागणी केली. जणूं काय अणूचें विभाजन झालेंच नाहीं, अशीच यामुळें जगाची समजूत होणार होती.

तथापि अणुशक्तीच्या स्वरूपाचा पूर्णतः अभ्यास केल्यानंतर हें स्पष्ट झालें कीं, या शक्तीचा शांततामय कार्यासाठीं उपयोग करावयाचा असेल तर लष्करी कार्यासाठीं होणाऱ्या तिच्या वापरावर परिणामकारक नियंत्रण घालण्याचा मार्ग शोधून काढला पाहिजे आणि मी हें स्पष्ट करूं इच्छितों कीं, अणुशक्तीचें स्वरूप व प्रक्रिया हीं समजून घेतल्यामुळेंच ही जाणीव स्पष्ट झाली.

क्षणभर तुमचा हात हीच अणुशक्ति आहे अशी कल्पना करा. तुमच्या खांद्यापासून मनगटापर्यंत मांस, हाडें व ग्रंथि आहेत. अणुशक्तिहि अशीच असते. ज्यापासून ती निर्माण होते तें विभाजनयोग्य द्रव्य तयार करण्याची प्रक्रिया सर्वत्र सारखीच असते; पण अखेर त्या शक्तीचा उपयोग कसाहि होवो, विभाजनयोग्य अशा ह्या द्रव्याचा उपयोग कारखाना चालविण्यासाठीं करावयाचा कीं बॉम्ब तयार करण्यासाठीं, शांततामय कार्यासाठीं कीं युद्धासाठीं करावयाचा, हें अगदीं शेवटच्या अवस्थेंत ठरत असतें.

शेवटीं आपण आपलें मनगट फिरवून जसें आपल्या बाहूंतल्या शक्तीचें कार्य ठरवतों, तसेंच एखादें आक्रमक राष्ट्र आंतरराष्ट्रीय बदमाषी व संहार यासाठीं ह्या साधनांचा उपयोग करील. म्हणजे घटक जरी शांततामय कार्यासाठीं वापरतां येण्यासारखे असले तरी अखेरीस त्यांचा उपयोग असा होऊं शकेल.

म्हणून अणुशक्तीचा उपयोग पूर्णपणें रचनात्मक कार्यासाठीं व्हावा, असें वाटत असेल तर विघातक कार्यासाठीं तिचा उपयोग करण्यावर नियंत्रण घातलें पाहिजे.

अमेरिकेनें अणुशक्तीच्या नियंत्रणासाठीं ज्या योजना सुचविल्या त्या सूचनांच्या मागें सर्व काळ आपल्याकडेच या शक्तीची मिरासदारी रहावी, अशी भूमिका नव्हती. हळुहळू इतर राष्ट्रेंहि अणुशक्ति शोधून काढतील, हें ध्यानांत येणें आम्हांला भागच होतें. परंतु अणुशस्त्रास्त्रें एका राष्ट्राजवळ असोत कीं एकसष्ट राष्ट्रांजवळ असोत, त्यांमुळें मूलभूत प्रश्नाचें स्वरूप कांहीं बदलत

नाहीं. अणुशक्तीच्या लष्करी उपयोगावर परिणामकारक नियंत्रण घालण्याची एखादी योजना अस्तित्वांत असल्याखेरीज अणुशक्तीमुळें होणाऱ्या संहारापासून बचाव होण्याची खात्री कोणत्याहि राष्ट्राला वाटणार नाहीं.

हायड्रोजन बॉंब व संभाव्य कोबाल्ट बॉंब यामुळें हें सत्य अधिक स्पष्टपणें जाणवूं लागलें आहे. रशियाबरोबर कांहींतरी करार करतां येईल, ह्या आशेवर कांहीं लोक अणुशक्तीच्या स्वरूपाकडेच दुर्लक्ष करतात. पण अणुशक्तीच्या स्वरूपाकडे दुर्लक्ष करणारा कोणताहि करार हा अखेरीस भयानक भ्रमच ठरेल. जर एखाद्या राष्ट्राला आवश्यक तें नियंत्रण मंजूर नसेल, तर त्यासाठीं आपण जें आवश्यक आहे त्यापेक्षां कमी असें कांहींतरी स्वीकारावें असें नाहीं. आपण अणुशक्तीचें नियंत्रण करूं शकतों कीं शकत नाहीं, एवढाच प्रश्न आहे. जर नियंत्रण घालणें अशक्य असेल तर निरर्थक करार करून स्वतःची फसवणूक करण्याची गरज काय ?

राष्ट्राध्यक्ष आयसेनहॉवर यांनीं अणुशक्तीचा आंतरराष्ट्रीय सांठा करण्याची योजना मांडली होती. जर त्यामुळें या शक्तीचा शांततामय कार्यासाठीं अधिक प्रमाणावर उपयोग करणें शक्य होणार असेल, तर केवळ असा सांठा करणें योग्य होईल. परंतु असा सांठा केल्यानें अणुशक्तीच्या नियंत्रणाचा मूलभूत प्रश्न सुटेल, हें शक्य नाहीं. या सांठ्यासाठीं जरी अणुशक्ति देण्यांत आली तरी निरनिराळीं राष्ट्रें अण्वस्त्रांसाठीं बराचसा भाग स्वतःजवळ राखून ठेवतीलच.

अणुबॉम्बच्या हल्ल्याचा धोका यामुळें कमी होणार नाहीं.

अण्वस्त्रनिर्मितीची स्पर्धाहि कमी होणार नाहीं.

अणुशक्तीच्या परिणामकारक नियंत्रणासाठीं जी योजना मीं आपल्या सरकारच्या वतीनें सुचविली ती जरी रशियाला मान्य नसली तरी दुसरी एखादी नियंत्रणयोजना रशियाला मान्य होईल, अशा पद्धतीनें तयार करतां येईल अशी मला नेहमींच आशा वाटत आली आहे. अशी योजना तयार करण्याचा प्रयत्न कधींच सोडून देतां कामा नये. पण जिच्यामुळें आंतरराष्ट्रीय तपासणी आणि नियंत्रण परिणामकारकपणें करतां येणार नाहीं, अशी कोणतीहि योजना आपण किंवा इतर राष्ट्रांनीं मान्य करावी,

असें मला वाटत नाहीं. ‘सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पण्डितः’ हें सुभाषित या बाबतींत लागू पडत नाहीं. येथें पूर्ण भाकरीच हवी, तुकडा चालणार नाहीं.

अणुशस्त्रांवर फक्त बहिष्कार घालणें म्हणजे जे कायदे पाळीत नाहींत, त्यांचा फायदा करून देऊन जे कायदे पाळतात, त्यांना शिक्षा करण्यासारखें होण्याचा संभव आहे. युद्धबंदीचा केलॉगब्रियाँ करार पहिल्या महायुद्धानंतर झाला. त्याचा अनुभव असाच आला. ह्या कराराच्या जनकांना शांततेचें नोबेल पारितोषिक मिळालें; पण त्याचा प्रत्यक्ष अनुभव असा आला कीं, आपल्या संरक्षक सामर्थ्याकडे दुर्लक्ष करण्याला हरकत नाहीं, अशी शांततामय राष्ट्रांनीं समजूत करून घेतली. त्यामुळें झटपट युद्ध करून या राष्ट्रांना नामोहरम करण्याचा जुगार खेळण्याला हिटलरला प्रोत्साहन मिळालें.

जर शांतता स्थापन व्हायला हवी असेल तर रशिया आणि अमेरिका ह्यांच्यांत शस्त्रकपातीबाबत कांहींतरी करारमदार झालेच पाहिजेत; पण हा कार्यक्रम सापेक्ष शस्त्रकपातीचा असावा. एका राष्ट्राची शस्त्रकपात आणि दुसऱ्या राष्ट्राची शस्त्रसज्जता ह्यांचा तोल सारखा राखला गेला पाहिजे. शिवाय एकाच शस्त्राच्या बाबतींत कपातीचा समतोल कार्यक्रम आंखतां येणार नाहीं. युद्धाचीं सर्वच प्रमुख अस्त्रें नियंत्रणाखालीं आणलीं गेलीं पाहिजेत. कारण वेगवेगळ्या शस्त्रांच्या संहारक शक्तींत जो फरक आहे, तो फक्त परिणामाचा आहे.

जर आपल्याला एका अस्त्रावर नियंत्रण घालण्यांत यश मिळालें तर आपण सर्वच शस्त्रास्त्रें नियंत्रित करूं शकूं. अणुशक्तीच्या नियंत्रणाची अमेरिकन योजना मांडण्यामागें आमची हीच भूमिका होती. जर श्री काढतां आली तर पुढील अक्षरेंहि काढतां येतील. अशा प्रकारें शस्त्रास्त्र-नियंत्रण करतां करतां आपण अखेर युद्धाचाच नायनाट करूं शकूं.

पण अशा प्रकारें समतोल शस्त्रकपातीच्या कार्यक्रमाचा तपशील ठरविण्या-पूर्वीं परिणामकारक तपासणी व नियंत्रण होऊं शकेल ह्यासंबंधीं जगाची खात्री पटली पाहिजे. जर कांहीं राष्ट्रांना दुसरीं राष्ट्रें काय करताहेत हें माहीत नसेल, तर त्या अज्ञानामुळेंच त्यांना करार मोडण्याचा मोह पडेल.

* ४ *

ह्या काळांत कोणालाहि, मग तो ह्या देशांतला असो वा इतर देशांतला असो, एक गोष्ट परवडणार नाहीं. आणि ती म्हणजे रशियन सरकारबद्दल मनोराज्यें रचणें. आपण त्याबद्दल वस्तुस्थितिनिष्ठ दृष्टिकोन ठेवला पाहिजे. कारण त्यावरच आपल्या इच्छाआकांक्षांचें भवितव्य अवलंबून आहे.

सोव्हिएट पद्धतींत साधनसंपत्तीचें विभाजन कशा प्रकारें केलें जातें यावर मुख्यतः लक्ष केंद्रित केलें पाहिजे, अशी माझी भावना आहे. या साधन-संपत्तीपैकीं जनतेच्या वांट्याला किती जाते (आणि खरोखरच तिला पुष्कळच अधिक मिळणें आवश्यक आहे) आणि युद्धाला सहाय्यभूत होणाऱ्या उद्योग-धंद्यांसकट सर्व प्रकारच्या लष्करी कार्यासाठीं किती खर्च होते, हें लक्षांत घेतलें पाहिजे. साधनसंपत्तीच्या वांटणीसंबंधींच्या त्यांच्या निर्णयावरूनच त्यांनीं युद्धाबाबात कोणते आडाखे बांधले आहेत, तें कळून येईल.

ही कसोटी लावून पाहिलें तर रशियाचें ताजें अंदाजपत्रक कांहीं फारसें उत्साहवर्धक दिसत नाहीं. गेल्या वर्षीपेक्षां यंदा लष्करी खर्च १० टक्क्यांनीं कमी केल्याचें सांगण्यांत येतें. पण ह्या १० टक्क्यांपैकीं धातुशोधन, रसायन, वगैरे युद्धोपयोगी उद्योगधंद्यांसाठीं बराचसा भाग खर्चीं पडणार आहे; रशियन लोकांच्या रहाणीचा दर्जा सुधारण्यासाठीं नव्हे.

म्हणजे याचा अर्थ असा कीं, रशियाच्या युद्धतयारीचा कार्यक्रम कदाचित् वाढत्या मुदतीचा केला गेला असेल, पण युद्धसाहित्याकडून आपण ग्राहको-पयोगी साहित्यनिर्मितीकडे वळूं, असें जें आश्वासन आतांपर्यंत देण्यांत येत होतें, तें कांहीं प्रत्यक्षांत उतरलेलें दिसत नाहीं.

सुमारें वर्षापूर्वीं रशियन पंतप्रधान मालेन्कॉव्ह यांनीं अशी कबुली दिली होती कीं, गेल्या तीस वर्षांच्या काळांत रशियांतील लोखंड, पोलाद, सिमेंट वगैरे मोठ्या उद्योगधंद्यांची वाढ सरासरी पन्नास पटींनीं झाली तर उपभोग्य वस्तूंचें उत्पादन केवळ बारा पटींनीं वाढलें. रशियन कामगारांपैकीं फक्त तीस टक्के कामगार ग्राहकोपयोगी उद्योगधंद्यांत काम करतात, अशीहि कबुली त्यांनीं दिली. युद्धाच्या दिशेनें चाललेली ही तयारी आहे. दुसऱ्या महायुद्धा-

पूर्वी जर्मनीची अर्थव्यवस्था युद्धसज्जतेला जुंपली गेली होती, तिच्यापेक्षां हिचें प्रमाण अधिक आहे.

युद्धोपयोगी उत्पादन आणि ग्राहकोपयोगी उत्पादन ह्यांत पूर्वीपासून इतकी तफावत असूनहि ह्या अंदाजपत्रकांत पहावें तर युद्धाला उपयोगी पडणाऱ्या साहित्याचें नियोजित उत्पादन हें उपभोग्य मालाच्या नियोजित उत्पादनापेक्षां कितीतरी अधिक आहे असें दिसतें.

रशियांतील राहणीचा दर्जा सुधारला असल्याच्या बऱ्याच गोष्टी सांगितल्या जातात. कांहीं थोडी सुधारणा झाली आहे, हें कबूल केलें पाहिजे. पण रशियन साधनसंपत्तीच्या वांटणींत युद्धतयारीला जें प्राधान्य देण्यांत येतें, तें तसेंच चालू आहे. त्यांत कांहीं मूलभूत बदल झालेला नाहीं.

शांततेसाठींच रशियनांच्या रहाणीचा दर्जा सुधारला पाहिजे, असें माझें अनेक दिवसांपासूनचें मत आहे. त्यामुळें रशियन लोक दीर्घ काळपर्यंत अनंत हालअपेष्टा भोगीत आले आहेत त्यांना स्वास्थ्य मिळेल आणि रशियाच्या नियंत्रकांना लोकांच्या भावनांना प्रतिसाद द्यावासा वाटेल, असें मला वाटतें. माझा ह्यावर विशेष भर आहे आणि ह्याबद्दल मला पोटतिडीक वाटते म्हणूनच रशियन लोकांच्या वांट्याला राष्ट्रीय साधनसंपत्तीचा फारच थोडा भाग आल्यानें माझी निराशा झाली.

ह्यासंबंधीं मला आशादायक चित्र रंगवितां आलें असतें तर बरें वाटलें असतें. पण तात्पुरत्या निकडीसाठीं तडजोड करूं नये आणि जें अप्रिय असेल तें टाळण्यासाठीं मनोराज्यें रचूं नयेत, अशी माझी विचारसरणी आहे. प्रत्यक्ष अनुभवावर आधारलेलें विवेकनिष्ठ तत्त्वज्ञान मला पुरस्कारावयाचें आहे. म्हणून मी उगीच आशादायक चित्र रंगवीत नाहीं.

ज्याच्याशीं आपल्याला मुकाबला करावयाचा, तें सोव्हिएट सरकार असो, अणुशक्ति असो, चलनवाढ असो, वा मंदीचें भय असो, वा युद्धाचें भय असो, त्याचें स्वरूप समजून घ्यावें, हाच या तत्त्वज्ञानाचा दृढ असा पाया आहे.

हें जग आणि ही मानवजात ह्यांच्या जटिल अशा परस्पर संबंधांतून जे नियम सिद्ध होतात ते रद्द करणें आपणांला अशक्य आहे. तसें करणें म्हणजे गुणाकार-भागाकाराचे नियम रद्द करण्याचा प्रयत्न करण्यासारखें आहे. हे

नियम समजावून घेण्याचें व ते आपले शत्रु न करतां मित्र करण्याचें कार्य मानवाला करतां येईल व तेंच त्यानें करावें.

ज्या प्रमाणांत हे नियम आपण पूर्वीं समजावून घेतले आणि आपल्या उपयोगासाठीं ते वापरांत आणले, त्या प्रमाणांत आपण जीवनसंग्रामांतील प्रश्न सोडवूं शकलों. भावी काळांत प्रगति करण्यासाठीं हेंच मार्गदर्शक तत्त्व आपण स्वीकारलें पाहिजे.

" जरी वस्तुस्थिति माझा घात करणार असली तरी तिला तोंड देण्याची शक्ति, हे परमेश्वरा, तूं मला दे " हें हक्स्लीचें वचन आपण ध्येयवचन म्हणून स्वीकारावें अशी माझी सूचना आहे.

* * *

# आर्थिक वातावरण

विज्ञानाच्या आणि वैद्यकाच्या क्षेत्रांत अणूचें विभाजन करणें किंवा एखाद्या दुःसाध्य रोगावर रामबाण उपाय शोधून काढणें अशासारखे विजय मिळवणारा माणूस मानवी व्यवहार योग्य प्रकारें कां सांभाळूं शकत नाहीं, हा प्रश्न मीं विचारला आहे.

वैद्यक, खगोल वा पदार्थविज्ञान ह्यांसारख्या शास्त्रीय क्षेत्रांचा संबंध आला कीं आपण महामानव असल्यासारखें वागतों. पण राज्यशासन वा अर्थव्यवहार यांचा संबंध आला कीं आपण लहान पोरांसारख्या गफलती करतों. मानवा-संबंधींच्या शास्त्रांत आपली फारशी प्रगति झाली नाहीं, हें याचें एक कारण आहे. इतिहास वाचतांना आपल्याला कांहीं प्रकारच्या घटना वारंवार घडलेल्या आढळतात. एखाद्या माणसाला अतिरिक्त सत्ता दिली कीं तो तिचा दुरुपयोग करूं लागतो. चलनाच्या किंमतीशीं चाळे केले कीं त्यांत हटकून अपयश येतें. किंवा जॉन लॉच्या ' मिसिसिपी बबल ' सारख्या खोट्या कंपन्या कोसळून पडतात, किंवा १९२९ सालांतल्याप्रमाणें शेअर बाजारांत घसर-गुंडी होते.

पण मानवी अनुभवाच्या सागरांतून जर आपण शहाणपणाचें मीठ काढूं शकलों, तर आपल्याला असें दिसून येईल कीं, वारंवार घडणाऱ्या या घटनांना कांहीं अर्थ आहे. मानवी व्यवहाराचें नियंत्रण करणाऱ्या नियमांचें स्वरूप समजावून घेण्यास त्याचा आपल्याला उपयोग होऊं शकेल.

तथापि माहितीच्या किंवा ज्ञानाच्या अभ्यासापेक्षां आपले इतर दोषच आपल्याआड येत आहेत. हे नियम काय आहेत आणि ते कशा प्रकारें कार्य करतात हें माहीत असून सुद्धां पुष्कळदां आपण त्या नियमांनुसार वागलों नाहीं.

' उद्यां ' काय वाटेल तें होवो ' आज ' जें मिळण्यासारखें आहे तें बळकावून घ्या, अशा वृत्तीनें आपण वागतों. जें करणें आवश्यक आहे तें अप्रिय आहे म्हणून वा लोकप्रिय होणार नाहीं म्हणून करण्याचें आपण

लांबणीवर टाकतों. परंतु आजच्या काळांत विशेषतः आपल्या संस्कृतीवरच सतत आघात होत असतां अशा प्रकारें दुर्लक्ष करणें केव्हांहि फायद्याचें ठरणार नाहीं.

कोरियामध्यें आणि चीनमध्यें आपण हेंच पाहिलें आणि आतां इंडोचीन-मध्येंहि तोच अनुभव येत आहे. वेळेवरच उपाययोजना करण्याच्या बाबतींत कुचराई करण्याचें व्रत चालू न ठेवतां वेळींच धडा घेऊन आपण आणि आपले मित्र युरोपियन संरक्षण करार घडवून आणूं अशी आशा आहे.

तेजी, मंदी इत्यादि आर्थिक प्रश्नांवर आपण प्रथम लक्ष केंद्रित करूं. या प्रश्नाचा अनेक दृष्टिकोनांतून विचार करतां येईल. मागणी व पुरवठा या-संबंधींच्या नियमांची आपणां सर्वांना माहिती आहे. त्याचाच फेरविचार करून मी या प्रश्नाचा ऊहापोह करणार आहें.

अर्थशास्त्राच्या मूलतत्त्वांपेक्षां हा सिद्धान्त अत्यंत मूलभूत स्वरूपाचा आहे. आणखी एखादी मंदी आली तर तिचें रहस्य हा सिद्धान्त आपल्याला सांगेल. पण या नियमाची कितपत माहिती असते ? आपल्यासमोर काय वाढून ठेवलें आहे, किती गोष्टी पणाला लागल्या आहेत, हें माहीत असूनहि या नियमांनुसार जी शिस्त लावून घ्यावयास हवी ती आपण कां लावून घेत नाहीं ?

प्रथमतः आपण मागणी व पुरवठा या नियमाची अंमलबजावणी कशी होते, तें पाहूं या. ह्या प्रश्नाचें पुस्तकी उत्तर देण्यासाठीं अनेक विद्यार्थी उत्सुक झाले असतील. ते म्हणतील, मागणी वाढली म्हणजे किंमती वाढतात. त्यामुळें उत्पादनाला चालना मिळते. चांगला फायदा मिळूं लागल्यानें नवे उत्पादक उत्पादनक्षेत्रांत उतरून स्पर्धा करूं लागतात, त्यामुळें पुरवठ्यांत वाढ होते. बाजारांत त्या वस्तूची जागा घेणाऱ्या अन्य वस्तु येतात व किंमती वाढूं लागल्या म्हणजे ग्राहकहि कमी प्रमाणांत माल खरेदी करूं लागतात. कालांतरानें मागणी कमी झाल्यामुळें पुरवठा वाढतो आणि मग समतोल निर्माण होतो, आणि किंमती खालीं येऊं लागतात.

किंमती खालीं आल्यावर मग चक्र उलटें फिरूं लागतें. किंमती खालीं आल्यानें बाजारांतून बदली वस्तु नाहींशा होतात. किंमती उतरल्यामुळें मागणी वाढते. किंमती वाढलेल्या होत्या तेव्हां लोकांनीं मोटारी, कपडे, घरें

विकत घेण्याचें लांबणीवर टाकलेलें असतें, पण आतां किंमती खालीं आल्यानें लोक त्या वस्तु विकत घेऊं लागतात. कालांतरानें मागणी वाढते, पुरवठा कमी होतो व नवा समतोल निर्माण होऊन किंमती पुन्हा चढूं लागतात.

हें सगळें अगदीं खरें आहे, पण यांत दोन महत्त्वाच्या घटकांकडे दुर्लक्ष होत आहे.

पहिली गोष्ट अशी कीं, मागणी आणि पुरवठा ह्यांचें चक्र कधीं थांबत नाहीं. हें चक्र चालत राहून एकमेकाशीं जुळवून घेण्याची प्रक्रियाहि सतत चाललेली असते. याचा अर्थ असा कीं, मागणी-पुरवठ्याच्या या चक्राकडे एक मोठ्या प्रक्रियेचा भाग म्हणून पाहिलें पाहिजे; मधून मधून घडणाऱ्या घटना म्हणून त्याचा विचार होतां कामा नये. या महत्त्वाच्या सत्याकडे दुर्लक्ष होतें आणि म्हणूनच मागणीपुरवठ्याच्या नियमाच्या कार्यावर नियंत्रण ठेवण्यांत अनेकदां अपयश येतें.

दुसरी गोष्ट अशी कीं, मागणी, पुरवठा, किंमती यांच्या बाबतींत समतोल निर्माण होण्यास, त्यांची जुळवाजुळव होण्यास कांहीं काळ जावा लागतो. एखादें बटन दाबून कांहीं मागणीपुरवठ्यांतील समतोल निर्माण करतां येत नाहीं. कित्येक वेळां एक पीक काढून घेऊन दुसऱ्या पिकाची पेरणी करतों त्याला सुद्धां सबंध वर्ष जाऊं द्यावें लागतें.

मागणीपुरवठ्याची या चक्राची गति मंद असते. त्या गतीनें जाण्यासाठीं लागणारा अवधि आपण देऊं न शकलों तर युद्धकाळांत अशीच स्थिति होते.

अर्थव्यवहाराविषयींची ही गफलत, ही नजरचूकच आपली या काळांतील सर्वांत भयानक अशी गफलत ठरली आहे.

मागणीपुरवठ्याच्या नियमाचें युद्धकाळांत होणारें कार्य आणि शांततेच्या काळांत होणारें कार्य ह्यांतला फरक न ओळखल्यामुळें आपलें आणि सर्वच जगाचें जेवढें नुकसान झालें आहे, तेवढें युद्धाखेरीज इतर दुसऱ्या कशानेंहि झालें नाहीं.

* २ *

१९१४ पासून बहुतेक वेळां आपण युद्धांत प्रवेश तरी करीत आलों आहोंत किंवा युद्धांतून बाहेर पडत आलों आहोंत. कोरियासारखीं लहान-

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम ५४३७८ ... 2066 ... १४३०७


सहा‍न दिव्यें सोडलीं तरी ह्या अवधींत दोन वेळां आपणांला युद्धकालीन गरजा भागविण्यासाठीं पुन्हा त्या अर्थव्यवथेंत तसाच आमूलाग्र बदल करावा लागला आहे.

ह्या सबंध अवधींत युद्धाची भीति नाहीं वा युद्धोत्तर कालांत करावे लागणारे बदल नाहींत, असें एवढेंच वर्ष गेलें असेल नसेल. असें असूनहि या काळांत झालेला अर्थशास्त्रविषयक विचार पाहिला तर असें दिसतें कीं, जणूं आपण शांतताकालीन प्रश्नच हाताळीत आहोंत.

युद्धकाळांतील व शांतताकाळांतील अर्थव्यवहारांत दोन महत्त्वाचे फरक असतात. पहिली गोष्ट म्हणजे युद्धकाळांत आपल्याला अवधि नसतो. आघाडी-वर गेलेल्या सैनिकांना बंदुका आणि इतर साहित्य शक्य तितक्या थोड्या वेळांत पुरवावयाचें असतें. वेळ म्हणजे जीवनमरणाचा प्रश्न असतो.

युद्धासाठीं म्हणून देशाच्या साधनसंपत्तीचा वेगळ्या दिशेनें उपयोग करावा लागतो. लोकांच्या रहाणीचें मान सुधारावें यासाठीं उत्पादन करावयाचें नसून आपलें आस्तित्व टिकविण्यासाठींच उत्पादनावर भर द्यावा लागतो.

आपलें अस्तित्व टिकविण्यासाठीं करावें लागणारें हें उत्पादन जर शांतता-कालीन मागणीपुरवठ्याच्या तत्त्वानुसार होऊं लागलें तर युद्धांत पराभव पत्करावा लागेल.

वॉर इंडस्ट्रीज बोर्डाचा अध्यक्ष म्हणून पहिल्या महायुद्धाच्या काळांत घेतलेल्या अनुभवारून मीं हा नित्कर्ष काढला. तत्पूर्वी आधुनिक पद्धतीच्या युद्धासाठीं म्हणून अमेरिकेला कधीं संघटित व्हावें लागलें नव्हतें. प्रयोग करीत व चुका करीत त्या काळांत आपल्याला मार्ग काढावा लागला. शांतता-काळाप्रमाणें जर अर्थव्यवहार चालू दिला तर युद्धसाहित्याच्या उत्पादनांत अडथळे येतील, हें आम्हांला लवकरच जाणवलें. त्या पद्धतीमुळें जरी कांहीं लोकांचा फायदा झाला तरी आपल्या सैनिकांना व त्यांच्या कुटुंबीयांना हाल सोसावे लागले असतें, हेंहि आम्हीं ओळखलें.

सर्वच अमेरिकन उद्योगपतींना हें स्पष्ट करून सांगणें फारसें सोपें नव्हतें. कारण ज्या रीतीनें आपण आपला उद्योगधंदा चालवितों तींत ढवळाढवळ

करण्याचा सरकारचा अधिकार नाहीं, अशीच अनेकांची भावना होती. आम्हीं जेव्हां पोलादाची किंमत ठरवून दिली तेव्हां यू. एस्. स्टीलचे जज गॅरी किती खवळले तें मला आठवतें. तसेंच मोटर कारखान्यांच्या उत्पादनापैकीं तीनचतुर्थांश युद्धासाठीं वापरलें गेलें पाहिजे, असें आम्हीं सांगितलें तेव्हांहि अनेक कारखान्यांचे मालक संतापले. पण आम्ही खंबीर राहिलों. इतर लोकांच्या गरजा कमी करूनच युद्धाच्या गरजा भागविणें शक्य होतें.

युद्ध संपल्यावर जेव्हां मी युद्धकाळांत आलेल्या अनुभवांचा विचार करूं लागलों तेव्हां माझें असेंच मत झालें कीं, युद्धकालीन संघटन परिणामकारक व्हावयाचें असेल तर शांततेच्या काळांत ज्या प्रकारें मागणीपुरवठ्याच्या तत्त्वाची अंमलबजावणी होते त्या प्रकारें ती युद्धाच्या वेळीं होऊं देतां कामा नये. पण याचा अर्थ असा नव्हे कीं, मागणीपुरवठ्याच्या तत्त्वाकडे दुर्लक्ष करावें. उलट अधिक लक्ष दिलें पाहिजे.

युद्धकालीन संघटन यशस्वी करण्यासाठीं मागणीपुरवठ्याच्या तत्त्वाचा प्रत्येक घटक युद्धाच्या गरजा भागविण्याकरितांच उपयोगांत आणला गेला पाहिजे. शांततेच्या काळांत खरेदीविक्री अनिर्बंध होऊं देऊन आपण अर्थव्यवहारांत समतोल येऊं देतों, तर युद्धाच्या काळांत हा समतोल विचारपूर्वक मार्गदर्शन करून साधावा लागतो.

पहिल्या महायुद्धाच्या वेळीं अमेरिकेचें संघटन करण्याचे जे प्रयत्न आम्हीं केले, त्यांचा उद्देश एकच होता : तो म्हणजे युद्धकालाला योग्य असा मागणीपुरवठ्याचा न्याय शोधून काढणें.

कोणत्या मालाचें किती उत्पादन करावयाचें हें बाजारभावावर अवलंबून ठेवण्याऐवजीं देशाची साधनसंपत्ति कशी आणि कुठें उपयोगांत आणावयाची हें सरकारनें ठरवून दिलें. त्यांत उद्देश असा कीं, जी गोष्ट प्रथम व्हावयास हवी तिला अग्रस्थान मिळालें. त्यामुळें ज्या साधनसामग्रीचा तुटवडा होता तिचें उत्पादन वाढविणें आवश्यक झालें. तसेंच ह्या साधनसामग्रीच्या कमी निकडीच्या उपयोगावर नियंत्रण घालून तिची होणारी मागणी कमी करण्यांत आली. बांधकाम व इतर तशाच प्रकारचीं कामें जीं पुढें ढकलण्यासारखीं होतीं तीं थांबवण्यांत आलीं आणि बांधकामासाठीं बदली वस्तु

वापरण्याला उत्तेजन देण्यांत आलें. बांधकामाच्या नमुन्यांत सारखेपणा आणून आणि जुनाच माल वापरण्याला उत्तेजन देऊन आम्ही साधनसामग्री व मजुरी वांचविली.

जर पहिल्या महायुद्धांत घेतलेले धडे दुसऱ्या महायुद्धांत आपण उपयोगांत आणले असते तर दुसरें युद्ध एखाद्या वर्षानें तरी लवकर आटोपलें असतें. आणि त्यामुळें अर्थातच जीवितहानि व वित्तहानि कमी झाली असती. पण आपण सर्व साधनसंपत्तीचें सुरुवातीलाच नियंत्रण करण्याऐवजीं अडखळत पावलें टाकलीं. सल्लागार मंडळें वगैरे नेमण्याचा प्रयोग करून पाहण्याचा मार्ग स्वीकारला आणि त्यामुळें जेथून सुरुवात व्हायला हवी होती तिथें आम्ही शेवटीं येऊन थडकलों.

चलनवाढीला आळा घालण्याच्या बाबतींत हा हलगर्जीपणा विशेष दिसून आला. चलनवाढ व नफेबाजी यांना आळा घालण्याचा परिणामकारक आणि योग्य मार्ग म्हणजे कमाल मर्यादेपर्यंत कर बसविणें व इतर पैशाच्या व्यवहारा-वर निर्बंध घालणें आणि त्याबरोबरच मजुरी, किंमती, उत्पादनखर्च इत्या-दिकांच्या कामाला मर्यादा ठरवून देणें. अर्थव्यवहार आपल्या आटोक्याबाहेर जाण्यापूर्वींच, आणीबाणीची परिस्थिति उद्‍भवतांच हे उपाय योजले पाहिजेत. अर्थव्यवहाराचा असा समतोल राखला कीं, युद्धाच्या गरजा भागविण्यासाठीं इतर उपाययोजना सहज करतां येतात.

परंतु दुसरें महायुद्ध व कोरियन युद्ध या दोन्ही आणीबाणीच्या वेळीं काय करावयास हवें हें अगदीं उघड असतां, प्रत्यक्ष उपाययोजना होण्याला विलंब लागला. किंमती भरमसाट वाढेपर्यंत कांहीं उपाययोजना सहज करतां येतात.

दुसऱ्या महायुद्धाच्या सुरुवातीलाच नियंत्रणें न घातल्यानें त्या युद्धाचा खर्च कमींत कमी शंभर निखर्व डॉलर्सनीं वाढला. कोरियन युद्धाच्या वेळीं तीच चूक पुन्हा केल्यामुळें त्यानंतरच्या संरक्षणखर्चाला चाळीस खर्व डॉलर्स अधिक खर्च पडला. याचा जर विचार केला तर असें दिसेल कीं, ज्या राष्ट्रीय कर्जाचा एवढा मोठा भार आपल्या डोक्यावर बसला आहे त्यापैकीं निम्मा तरी या चलनवाढीमुळें बसला आहे आणि ही चलनवाढ टाळतां येणें शक्य होतें.

* ३ *

ज्या लाखों लोकांचें उत्पन्न ठराविक आणि अल्प असतें, त्यांची ह्या चलनवाढीमुळें क्रूर पिळवणूक झाली. सरकारी खातीं, कॉलेजें, हॉस्पिटलें आणि इतर अनेक संस्था ह्यांचीं अंदाजपत्रकें पार कोसळून पडलीं. न्यूयॉर्क शहरांतल्या भुयारी रेल्वेचें भाडें वाढविलें गेलें आहे. पण हा जो वाढीव पैसा मिळतो आहे, तो सगळा वाढलेल्या खर्चासाठीं वापरला जातो आहे. शिक्षक, आग विझविणारे आणि इतर कित्येक कीं, ज्यांचें उत्पन्न या चलनवाढीशीं स्पर्धा करूं शकलें नाहीं, ते मदतीची मागणी करताहेत. आणि ती न्याय्यच आहे.

युद्धकालीन व युद्धोत्तर चलनवाढीमुळें आपलें किंमतीचें प्रमाण विलक्षण वाढलें. सर्वसामान्य स्पर्धेच्या काळांत ज्या मर्यादेपर्यंत हें प्रमाण टिकूं शकतें, ती मर्यादा ओलांडून तें कितीतरी पुढें गेलें आहे. आणि आतां किंमती व खर्च, मजुरी व भाडीं यांची एकमेकांशीं सांगड घालण्याचें क्लेशकारक कार्य आपल्याला करावें लागतें आहे.

पण ही सांगड घालण्याची क्रिया चालू असतांनाच, हें किंमतीचें प्रमाणच कोसळून पुन्हा मंदी येते कीं काय अशी भीति लोकांना वाटूं लागली आहे. अशा मंदीला अगोदरच आळा घालण्याची वा प्रतिबंध करण्याची जबाबदारी सरकारची आहे, अशी बरीच ओरड चालू आहे. पण चलनवाढीनें आधीं तेजी येते व मग मंदी येते; तेव्हां या तेजीलाच प्रतिबंध करण्याचा धडा सरकारनें गिरवला नसेल तर मंदी थांबवण्याची जबाबदारी त्याला कशी पार पाडतां येईल, याचा खुलासा मात्र कोणी करीत नाहीं.

सतत चलनवाढ करून व आर्थिक व्यवहारांतले सर्व प्रमाद करून आपण मग माघारी फिरून, पश्चात्ताप झालेल्या लहान मुलांप्रमाणें आपण असें म्हणूं शकतों कां कीं, " आतां आम्हांला नीट वागावयाचें आहे. तेव्हां आतां असं कांहीं तरी करा कीं, ज्यामुळें आम्हीं केलेल्या या ब्रह्मघोटाळ्याची भरपाई आम्हांस करावी लागणार नाहीं. "

सरकारनें यंव करावें आणि त्यंव करावें म्हणून लोकांकडून मागणी होत असल्याचें मी ऐकतों किंवा वाचतों तेव्हां मला असा प्रश्न पडतो कीं,

जेव्हां चलनवाढ आटोक्याच्या बाहेर जाऊं नये म्हणून आम्ही तिच्याविरुद्ध झगडत होतों, तेव्हा हे लोक कां गप्प होते?

स्वतःला खास फायदे मिळावे म्हणून निरनिराळ्या गटांनीं चालवलेल्या स्वार्थी झगड्यामुळें गेल्या कांहीं वर्षांतली चलनवाढ निर्माण झाली आहे. सर्वांना सारख्याच प्रमाणांत लागू पडणारे आणि ज्यांमुळें किंमती आणि उत्पादनखर्च यांना आळा बसेल असे निर्बंध स्वीकारण्याऐवजीं प्रत्येक गट किंमती, मजुरी किंवा फायदा यांवर निर्बंध राहूं नयेत म्हणून स्वतःपुरता प्रयत्न करीत होता, पण त्याचबरोबर इतरांवर नियंत्रण घालण्याची मात्र मागणी करीत होता.

आतां किंमती, खर्च वगैरेची सांगड घालण्याचें कार्य चालू असतां पुन्हा खास फायदे मिळविण्यासाठीं तीच स्पर्धा चालू आहे. नव्या परिस्थितींत सोसावा लागणारा भार दुसऱ्या गटावर पडावा म्हणून प्रत्येक गट प्रयत्न करीत आहे. प्रत्येकाला कराराबाबत स्वतःला सूट हवी. पण इतरांना मात्र ती मिळूं नये असें वाटतें. मंदी टाळण्यासाठीं आपली मजुरी, किंमती वा फायदा चढत्या प्रमाणांतच असावा आणि इतरांची मिळकत मात्र प्रथम खालीं यावी, अशी मागणी होत असते.

सध्यां किंमती आणि खर्च यांची सांगड घालण्याचें जें कार्य चालू आहे त्यामुळें मंदी येईल असें मला वाटत नाहीं. १९२९ नंतर जें झालें त्याची पुनरावृत्तीच व्हावी असें मला वाटत नाहीं. परंतु चलनवाढीबाबत झालेल्या दुर्लक्षाचा भुर्दंड आपणांस आतां कांहीं ना कांहीं प्रमाणांत भरावाच लागेल. हा भुर्दंड किती असेल, हें दोन गोष्टींवर अवलंबून राहील. खास सवलती मिळविण्यासाठीं निरनिराळ्या आर्थिक गटांत चाललेला झगडा थांबवून राष्ट्रीय हिताला प्राधान्य देण्यांत आपण कितपत यशस्वी होतों आणि सर्व जगभर मागणीपुरवठ्याबाबतच्या परिस्थितींत जो बदल झाला आहे त्याच्याशीं आपण कसें जुळवून घेऊं शकतों, ह्या दोन प्रश्नांच्या उत्तरांवर हें बरेंचसें अवलंबून आहे.

युद्धोत्तर काळांत व्यापाऱ्यांची चलती होती ती आतां गेली आहे. आतां सर्वत्र स्पर्धा जाणवूं लागली आहे. या नव्या परिस्थितीशीं जुळवून घेण्याचें कार्य सरकारतर्फे होऊं शकत नाहीं. तें आपण प्रत्येकानें आपला व्यापार,

नोकरी, शेती या बाबतींत करावयाचें आहे. आपण उत्पादनखर्च कमी केला पाहिजे, भरपूर कष्ट केले पाहिजेत आणि आपला माल विकण्यासाठीं निकराची धडपड केली पाहिजे. जर एक बाजारपेठ आपण गमावली तर दुसरी शोधून काढली पाहिजे. जर नव्या तांत्रिक सुधारणेमुळें आपण उत्पादन केलेला माल मागें पडला असेल, तर आपल्या मालाचा इतर कार्याकडे कसा उपयोग होईल, हें आपण पाहिलें पाहिजे. किंवा ज्याला मागणी असेल अशा मालाचें उत्पादन करण्यास शिकलें पाहिजे.

ही सांगड जितक्या लवकर आपण घालूं तितकी ती चांगली. परंतु ही सांगड घालण्याच्या बाबतींत अतिरेक होतां कामा नये, होण्याची जरुरीहि नाहीं. आपण ही सांगड जरूर घालावी, पण मंदी आणण्याची गरज नाहीं.

आपल्यासारख्या शहरी गुंतागुंतीच्या समाजव्यवस्थेंत आर्थिक व्यवहाराला एक किमान पातळी राहिलीच पाहिजे, असें मी म्हणत आलों आहें. पण भरमसाट चढलेल्या किंमती खालीं आणूंच नयेत, असें जे कांहीं लोक मला सांगताहेत, त्यांच्या भूमिकेपेक्षां माझी भूमिका निराळी आहे.

युद्धकालांत व युद्धोत्तर कालांत वस्तूंचा पुरवठा कमी होता. या चणचणीचें प्रतिबिंबच वाढत्या किंमतींच्या रूपानें दिसत होतें. त्या किंमती टिकवायच्या असें सरकारच्या मनांत असलें तरी सरकार त्या टिकवूं शकणार नाहीं. ही वस्तुस्थिति लक्षांत घेतली पाहिजे. कॅन्यूट राजा ज्याप्रमाणें भरती थांबवूं शकला नाहीं, त्याचप्रमाणें नव्या परिस्थितींत मागणीपुरवठ्याची सांगड पडल्यामुळें जें कार्य चांगलें आहे, तें आपण थांबवूं शकणार नाहीं.

नव्या परिस्थितीशीं जुळवून घेऊन आपण ती सुसह्य करावयाची कीं झगडा करून ती अधिक बिघडावावयाची, हाच खरा प्रश्न आपल्यापुढें आहे व यांतूनच आपणांस मार्ग काढावयाचा आहे.

* ४ *

लोकांना कितीहि हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या तरी त्याकडे दुर्लक्ष करून आपली अर्थव्यवस्था बाजारपेठेच्या अमानुष कार्यपद्धतीच्या हवालीं करावी, असें मला कधींच वाटलें नाहीं. शेतकऱ्यांना आर्थिक समता मिळावी

म्हणून जॉर्ज एन् पिक व इतर तत्सम मताचे लोक यांच्याबरोबर मीं १९२० नंतरच्या दशकांत प्रयत्न केले. पुढें गेल्या महायुद्धांत अशी परिस्थिति आली कीं, जेवढें धान्योत्पादन होईल तेवढें आपल्याला लागूं लागलें. मदत दिली नसती तर ज्या लाखों शेतकऱ्यांना उत्पादन बंद करावें लागलें असतें, त्या शेतकऱ्यांनीं निर्माण केलेल्या धान्यालाहि मागणी होतीच.

आतां धान्य, खाद्यपदार्थ यांचा वाढीव सांठा आहे. या तथाकथित वाढीव सांठ्याबद्दलहि मला कांहीं भीति वाटत नाहीं. हे सांठेहि प्रत्यक्ष संपत्ति आहे. तिची खरी किंमत आपल्याला कळत नाहीं. कारण खप व राहणीचा दर्जा वाढविण्यासाठीं तिचा कसा उपयोग करावा, हें आपल्याला माहीत नाहीं.

आजची आपली शेतीविषयक परिस्थिति लक्षांत घेतां वाईट हंगामासाठीं तरतूद म्हणून प्रत्येकानें कांहीं झीज आतांच सोसली पाहिजे. पण युद्धकाळांत उत्पादनवाढीसाठीं म्हणून जें विशेष उत्तेजन देण्याची जरूरी होती, तसें उत्तेजन देण्याची आतां गरज नाहीं. युद्धकालामध्यें कित्येक राष्ट्रांचीं नित्याचीं अन्नसंपादनाचीं साधनें तोडलीं गेलीं. ही भरपाई करण्यासाठीं आपलें उत्पादन वाढविणें जरूर होतें. धान्यापुरतेंच नव्हे तर इतरहि बाबतींत हीं साधनें आतां बहुतेक पुन्हा उपलब्ध झालीं आहेत आणि म्हणून किंमतीच्या बाबतींत करावयाचें सहाय्य पूर्वींच्या मानानें आतां अधिक लवचिक ठेवायला पाहिजे.

अनेक शेतकऱ्यांना अशी भीति वाटते कीं, किंमती खालीं गेल्या तरी उत्पादनखर्च कमी होणार नाहीं. म्हणून आपण आर्थिक क्षेत्रांतील निरनिराळ्या घटकांचा तोल राखण्याचा प्रयत्न केला पाहिजे. याचा अर्थच असा कीं, हा प्रश्न आपण एखाद्या विशिष्ट गटाच्या दृष्टीनें विचार न करतां राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें विचार करून हाताळला पाहिजे.

राष्ट्रीय संरक्षणाच्या सर्व गरजा पूर्णपणें भागेपर्यंत आणि अर्थसंकल्प समतोल होईपर्यंत कर-आकारणींत कपात करण्याला माझा विरोध आहे. अर्थसंकल्प समतोल नसतां आणि राष्ट्रीय कर्जाचा एवढा भार शिरावर असतां कर कमी करणें, हें आर्थिक दृष्ट्या तोट्याचें आहे. त्याचप्रमाणें तें अनैतिकहि आहे.

तसेंच कांहीं जण सुचवितात त्याप्रमाणें सरकारनें मोठमोठीं सार्वजनिक बांधकामें काढण्याचा किंवा अर्थव्यवहारांत अधिक पैसा ओतण्याचा हा काळ नव्हे. चलनवाढ अधिक प्रमाणांत करण्याची मागणी करण्यापूर्वी आपण चालू चलनवाढ पचनीं पाडली पाहिजे आणि आपल्या मिळकतीची व शिलकीची खरी किंमत पुन्हा स्थापित होईल असें केलें पाहिजे. एका सरकारनें दुसऱ्या सरकारला कर्ज देण्याचें थांबवून खाजगी भांडवलदारांना संधि देण्याची वेळ आतां आली आहे. जगांतील सर्वच चलनें निर्बंधमुक्त करण्याचीहि वेळ आली आहे. जोंपर्यंत चलनें निर्बंधमुक्त होत नाहींत तोंपर्यंत आयात-जकाती कमी करणें व्यर्थ आहे.

थोडक्यांत म्हणजे मागणीपुरवठ्याच्या नियमांचें आपण पुन्हा काळजी-पूर्वक निरीक्षण केलें पाहिजे व पुन्हा त्याची व्यवस्थितपणें अंमलबजावणी केली पाहिजे. आपल्याला नव्या परिस्थितीशीं जी जुळणी करून घ्यावयाची आहे, तींत हा नियम आपणांस अपायकारक न ठरतां उपकारक ठरला पाहिजे.

मागणीपुरवठ्याची कार्यपद्धति ही एक न संपणारी परस्पर-परिणामांची सांखळी आहे, हें आपण पाहिलें आहे. एका दिशेनें जर एखादी गोष्ट केली तर अर्थव्यवहाराच्या इतर क्षेत्रांत तिच्याशीं तुल्यबळ अशी दुसरी एखादी गोष्ट घडते. सरकारनें योजलेले अनेक उपाय सर्व अर्थव्यवहाराला लागू पडतील असे नसतात, तर कांहीं मर्यादित अशा क्षेत्रासच लागू पडणारे असे असतात व म्हणूनच ते निष्फळ ठरतात.

मागणीपुरवठ्याचें हें रहाटगाडगें हवामानासारखें आहे. तें नेहमीं आपल्याबरोबर असतेंच; टाळूं म्हटल्यानें टाळतां यायचें नाहीं.

कृत्रिम रीत्या पाऊस पाडणारांनीं कितीहि प्रयत्न केले तरी ऊन केव्हां पडेल किंवा आभाळ केव्हां भरून येईल, हें आपल्याला ठरवितां येणार नाहीं. तथापि मार्कट्वेननें कांहींहि म्हटलें असलें तरी हवेबाबत आपण कांहीं करूं शकत नाहीं असें नाहीं. आपण घालतों ते कपडे, आपल्याला निवारा देणारीं घरें, त्याचप्रमाणें छत्र्या, हवा समशीतोष्ण ठेवणारीं यंत्रें विजेच्या साहाय्यानें ऊबदार ठेवणारीं ब्लँकेटें, शीतपेट्या वगैरे आपण हवामानाशीं कसें जुळवून घेतों ह्याचीं उदाहरणें आहेत. मागील अनुभव व दाखले यांचा अभ्यास

करून आपण हवामानासंबंधीं कांहीं अंदाज वर्तवूं शकतों व चांगल्या किंवा वाईट हवामानाला तोंड देण्यासाठीं तयारी करूं शकतों.

आर्थिक हवामान बदलण्याच्या, त्याच्याशीं जुळतें करून घेण्याच्या बाबतींतहि आपण हें करूं शकूं. मागणीपुरवठ्याची सतत चालणारी क्रिया बंद पाडूं शकणार नाहीं. पण आपण आपल्या गरजेप्रमाणें या क्रियापद्धतींत कांहीं फेरफार करून घेऊं शकूं आणि क्रियापद्धति बरोबर स्वतः जमवून घेऊं शकूं. आपणांला जर आर्थिक मंदी टाळावयाची असेल तर आपण प्रथम चलनवाढीला प्रतिबंध करायला शिकलें पाहिजे आणि त्याचप्रमाणें युद्धकाळांत आणि शांतताकाळांत मागणीपुरवठ्याच्या कार्यपद्धतींत जो फरक पडतो, त्याच्याशीं जुळवून घ्यावयाला शिकलें पाहिजे.

ज्याप्रमाणें पावसांतून निघून आसरा केव्हां घ्यावा, हें समजण्याची पात्रता आपल्याला यायला हवी, त्याचप्रमाणें सरकारनें केव्हां हस्तक्षेप करावा व एखाद्या क्षेत्रांतून केव्हां अंग काढून घ्यावें, हें कळण्याचें शहाणपणहि आपण शिकलें पाहिजे.

जर आपण आपल्याभोंवतालच्या परिस्थितीवर नजर टाकली तर, जें व्हायचें असेल तें होईल ही वृत्ति जाऊन सरकारनें हस्तक्षेप करावा, अशी वृत्ति कशी वाढत चालली आहे, तें कळून येईल.

बाहेरच्या देशांकडे पाहिलें तरी अनिर्बंध व्यापाराच्या मार्गांत किती तरी निर्बंध आपल्याला घातलेले दिसतील. पुरवठ्याचें किंवा उत्पादनाचें कांहीं विशिष्ट प्रमाण ठरवून दिलें जातें, आयात कर असतात, निर्यातीबाबत मदत दिली जाते, तसेंच चलन निर्बंध असतात. हे सर्व अनिर्बंध व्यापाराच्या मार्गांतल निर्बंधच होत.

वॉशिंग्टनमध्यें फेडरल रिझर्व्ह, इंटरस्टेट कॉमर्स कमिशन, फेडरल ट्रेड कमिशन, दि सिक्युरिटीज् ॲण्ड एक्स्चेंज कमिशन इ. अनेक कमिशनें चालू असतात. ट्रस्टविरोधी कायदे करून आपण स्पर्धेला उत्तेजन देतों, तर उचित व्यापाराविषयींचे कायदे करून आपण स्पर्धेवर नियंत्रण घालतों. कोणत्याहि क्षेत्रांत मागणीपुरवठ्याची कार्यपद्धति अनिर्बंधपणें चालू दिली जात नाहीं.

सरकारी रीत्या होणारा या हितकारक हस्तक्षेपांचा अर्थ असा नव्हे कीं, मानवी व्यवहार नियंत्रित करणाऱ्या मूलभूत आर्थिक नियमांपासून आपली मुक्तता करून घेतली आहे. उलट अर्थव्यवहारांत सरकारचा हस्तक्षेप जितका अधिक प्रमाणांत होतो, तितकें ह्या मूलभूत नियमांचें महत्त्व अधिक वाढतें.

केवळ अर्थव्यवहाराच्या बाबतींत नव्हे तर जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत सरकारनें व्यावयाच्या भूमिकेविषयीं गेल्या कांहीं वर्षांत आमूलाग्र मतपरिवर्तन झालें आहे आणि त्यामुळें मानवी अनुभवासंबंधींचे नियम आणि मूलभूत सत्यें यांच्याशीं जुळवून घेण्याची जरूरी अधिक वाढली आहे. हें कां आणि कसें होतें, याचा अधिक विचार मी आतां करणार आहें.

* * *

# मानवाचें एकमेव स्वातंत्र्य

सरकारची बदलत चाललेली भूमिका आणि तिचा आपणां प्रत्येकाच्या जीवनाशीं पोंचणारा संबंध ह्यांबद्दलचें विवेचन मीं माझ्या शेवटच्या भाषणासाठीं राखून ठेवलें आहे; कारण मी आतांपर्यंत जें बोललों त्याचें एक प्रकारें तें समालोचनच होणार आहे. शांतता वा युद्ध, समृद्धि वा मंदी, स्वातंत्र्य वा गुलामगिरी इत्यादिसंबंधींचे महत्त्वाचे प्रश्न आपण सरकारमार्फतच सोडविले पाहिजेत.

या मुद्द्यावर भर देतांना मला असें मात्र म्हणावयाचें नाहीं कीं, सरकार हेंच सर्वस्व आहे आणि माणसाला व्यक्ति म्हणून कांहींच महत्त्व नाहीं, किंवा असलें तर अत्यल्प आहे. माझें मत ह्याच्या अगदीं उलट आहे. जनतेची जागा घेण्यासाठीं सरकार नाहीं. तर जनतेला इष्ट असलेलें कार्य करण्याचें तें साधन आहे. व्यक्ति म्हणून आपण जर आपली जबाबदारी पार पाडली नाहीं तर हें हत्यार बोथट बनेल आणि कित्येक वेळां ज्यांना त्याचा उपयोग व्हावयाचा त्यांनाच तें मारकहि होईल.

सरकार हें नेहमीं जनतेच्या आकांक्षा पुऱ्या करण्याचें साधनच राहिलें पाहिजे. ज्या वेळीं तें साध्य बनतें, त्या वेळीं नात्सी जर्मनी किंवा सोव्हिएत रशिया यांच्याप्रमाणें भ्रष्ट सत्तेंत किंबहुना दडपशाहींत त्याचें पर्यवसान होतें.

आणि ज्या वेळेला आपण आपलें सरकार बदलण्याचा संकल्प करतों, त्या वेळेला वस्तुतः आपण स्वतःच बदलण्याचा संकल्प करीत असतों. आपले एकमेकांशीं संबंध कशा प्रकारचे असावेत, हें स्पष्ट करण्याचें कार्य सरकार करीत असतें. शासनसत्तेचें किंवा तिच्या कामगिरीचें स्वरूप बदलणें म्हणजे व्यक्ति वा गट म्हणून असलेले आपले परस्परसंबंधहि बदलण्यासारखें आहे.

सरकारवर ज्या मर्यादा घातलेल्या असतात, त्या म्हणजे आपण इतरांसाठीं काय करूं शकतों व इतर आपणांसाठीं काय करतात, यासंबंधींच्याच मर्यादा होत. वैयक्तिक स्वातंत्र्य, कुटुंब, मिळकत, शिल्लक व मालमत्ता

यांच्यावर आक्रमण होऊं नये म्हणून हे निर्बंध संरक्षक ठरतात. आपलें अस्तित्व टिकविण्यासाठीं चाललेल्या झगड्यांत निर्माण होणारे प्रश्न सोडविण्यासाठीं आपणांला जे अधिकार हवे असतात, ते जर सरकारला व आपल्याला या निर्बंधामुळें मिळत नसतील, तर हे निर्बंध दुर्बलतेचीं साधनेंच ठरतील.

हें सर्व लक्षांत ठेवून आपण सरकारच्या भूमिकेबद्दल चाललेल्या वादांत कोणत्या गोष्टी पणाला लागलेल्या आहेत, यांचा फेरविचार केला पाहिजे. या विषयाचा सांगोपांग विचार करावयाचा म्हटलें तर अनेक ग्रंथ लिहावे लागतील. तेव्हां या व्यापक प्रश्नाच्या कांहीं अंगांबाबत ओझरतें मतप्रदर्शन करणेंच मला येथें शक्य होईल.

* २ *

कोणत्या प्रकारचें सरकार आज आपल्याला हवें आहे ?

या प्रश्नाचें उत्तर देण्यापूर्वीं आपण पुढील तीन प्रश्नांचीं उत्तरें दिलीं पाहिजेत, असें मला वाटतें.

ज्या जगांत युद्धहि नाहीं व शांतताहि नाहीं, अशा जगांत आपणांला कोणत्या प्रकारचें सरकार हवें ? हा पहिला प्रश्न. दुसऱ्या प्रश्नाचा संबंध वैयक्तिक स्वातंत्र्याशीं पोंचतो. तो असा कीं, आपण आपल्याला शिस्त लावून घेऊं शकूं का ? कीं इतर आपणांवर जी शिस्त लादण्याला उत्सुक आहेत ती आपण लादून घेतली पाहिजे ? तिसरा प्रश्न अर्थव्यवहार आणि सार्वजनिक कल्याण या क्षेत्रांतील उपाययोजना पूर्वींच्या ‘ चाललंय तसं चालूं द्या ’ म्हणणाऱ्या काळांतील उपाययोजनेपेक्षां अधिक शहाणपणाची, कमी लोभीपणाची व कमी अन्याय्य कशी करतां येईल ?

हे तिन्ही प्रश्न कशा प्रकारें मांडण्यांत आले आहेत, हें तुमच्या ध्यानांत आलें असेलच, अशी माझी कल्पना आहे. आपलें स्वातंत्र्य टिकविण्याचा हा प्रश्न आहे असें मीं म्हटलें नाहीं. कारण केवळ स्वातंत्र्य आपल्याला नष्ट करूं शकेल. तसेंच आपल्या आर्थिक व सामाजिक जीवनांत हस्तक्षेप करण्याची जबाबदारी सरकारची आहे कीं नाहीं, याचा विचार आपणांला करावयाचा आहे, असेंहि मीं म्हटलें नाहीं.

हा झगडा आतां भूतकाळांत जमा झाला. कांहींहि न करणें किंवा होईल तें होऊं देणें, असलें धोरण असणारें सरकार ही आतां भूतकाळांतली गोष्ट झाली आहे. आज समाजजीवनाच्या प्रत्येक अंगावर सरकारचें कांहीं ना कांहीं नियंत्रण असलेलें दिसून येतें. आर्थिक क्षेत्रांतल्या ज्या बाबतींत सरकार प्रत्यक्षपणें व्यवहाराचें नियमन करीत नाहीं त्याहि बाबतींत प्रचंड करवसुली आणि दडपून टाकणारें राष्ट्रीय कर्ज यांच्या द्वारां सरकारी प्रभावाची जाणीव होतेच.

सरकार हा हस्तक्षेप न्याय्य व समतोल कसा ठरेल, हाच आजचा खरा प्रश्न आहे.

सरकारी हस्तक्षेप व आर्थिक न्याय हीं दोन्ही एकच होत, असें कांहीं वर्षांपूर्वीं मानलें जात असे. पण गेल्या कांहीं वर्षांत चलनवाढीमुळें कांहींना भोगाव्या लागलेल्या यातना आणि इतर कांहींना मिळालेला अन्याय्य फायदा यांचा विचार करा. या चलनवाढीमुळें झालेला अन्याय हा हस्तक्षेप न करण्याच्या आर्थिक धोरणाचा परिणाम नव्हे. सरकार-शासित अर्थव्यवहाराचा आणि राष्ट्रीय हिताला बाध आणून कांहीं वजनदार गटावर अनुग्रह करण्याच्या धोरणाचा हा परिणाम आहे.

सरकारी हस्तक्षेपामुळें आर्थिक सुरक्षितता मिळेल, अशीहि एक अपेक्षा पूर्वीं होती. पण आपण म्हातारे बनून काम करण्याला असमर्थ होऊं किंवा आपलीं मुलें मोठीं होतील त्या वेळीं आपल्या शिलकीला कांहीं खरी किंमत राहील कीं नाहीं त्याचीच जर कुणाला खात्री नसेल, तर सुरक्षितता तरी कितीशी राहिली ?

'निष्क्रिय' सरकारबाबत अशी एक टीका होत होती कीं, हितसंबंधी लोकांना राष्ट्रीय साधनसंपत्ति व जनता यांची लूट करण्याला मुक्तद्वार मिळावें, यासाठीं या सरकारचा उपयोग होत असे. पण आज आपले हितसंबंध पोसले जावेत किंवा आपल्याला मतें मिळावीं म्हणून सरकारी हस्तक्षेपाची मागणी करणारे लोक कितपत निःस्वार्थी आहेत ? "आमच्या वाटेला जाऊं नका" हें तत्त्वज्ञान सोडून "आमचें आम्हांला द्या" हें नवें तत्त्वज्ञान आपण स्वीकारावें काय ? हीच आपली इतिकर्तव्यता आहे काय ?

मला तसें वाटत नाहीं. आपल्याला ह्यापेक्षां अधिक कांहीं तरी चांगलें करतां येईल आणि आपण तें केलें पाहिजे.

पण अशा प्रकारें कांहीं चांगलें करावयाचें असेल तर सरकारनें एखादा प्रश्न हातीं घेतला कीं तो लगेच सुटतो, या भोळ्या समजुतीचा आपण त्याग केला पाहिजे. लोकांना व्यक्तिशः ज्या गोष्टी करतां येत नाहींत त्या सरकार-तर्फे होऊं शकतात हें खरें आहे. परंतु त्याचमुळें कोणतीहि व्यक्ति करूं शकेल त्यापेक्षां किती तरी पटीनें अधिक चुका सरकारकडून होतील. आपल्या हातून एखादी चूक झाली तर कांहीं थोड्या लोकांचेंच नुकसान होईल पण सरकार-कडून चूक झाली तर राष्ट्रच्या राष्ट्र रसातळाला जाण्याचा धोका असतो.

सरकारी हस्तक्षेपामुळें आपले प्रश्न आणखी एका प्रकारें अधिक कठीण बनतात. पूर्वीं अशी समजूत होती कीं, समाजांतल्या परस्परविरोधी घटकांना अनिर्बंध स्वातंत्र्य दिलें, अनिर्बंध स्पर्धा करूं दिली कीं सर्वांचा ज्यामुळें फायदा होईल अशा प्रकारचा समतोल आपोआप निर्माण होतो. पण सरकार आज ज्या प्रमाणावर हस्तक्षेप करीत आहे तें पाहतां अशा प्रकारच्या स्वयंभू सम-तोलावर आपल्याला विसंबतां येणार नाहीं. आपण आतां निश्चित निर्णय घेऊन आपल्या प्रयत्नांनीं समतोल साधला पाहिजे. थोडक्यांत म्हणजे पूर्वीं आपण निसर्गाला पूर्ण मोकळीक देत होतों; आतां आपणांसच विचार करून मार्ग आंखला पाहिजे. आणि हें फार भयंकर आहे, बिकट आहे.

हें मी थट्टेनें म्हणत नाहीं. बहुसंख्य लोकांच्या विचार करण्याच्या पात्रते-वर यापूर्वींच्या काळांत कोणतेंहि सरकार अवलंबून नसे. आज तें तसें आहे. बराच काळ राजे, सम्राट वा सैन्याधिपति असे सरदार यांच्याकडे शासन-कार्य सोंपविलें होतें. किंवा त्यांनीं तें आपल्या हातीं घेतलें होतें असें म्हणा. ग्रीस किंवा रोममध्यें प्राचीन काळीं लोकशाही होती, पण तिथेंहि समाजाचा जो वरचा प्रतिष्ठित वर्ग होता, त्याच्याच हातीं सरकारचीं सूत्रें होतीं.

आधुनिक लोकशाहीचा कालखंड सुरू झाल्यानंतर मूठभर लोकांनीं सरकार चालवण्याचें हें तत्त्व झुगारण्यांत आलें आणि मनुष्याला हित-अहित कळतें आणि तो स्वतःवर नियंत्रण घालून घेऊं शकतो, हें तत्त्व त्याऐवजीं मान्य झालें. गेल्या दोन शतकांत आधुनिक लोकशाहीची ज्या

वातावरणांत वाढ झाली त्यांत लोक व त्यांचे प्रश्न ह्यांची काळजी त्यांची त्यांनीं घ्यावी म्हणून त्यांच्यावरच सोडून देण्यांत आलें. ह्याच काळांत वसाहत करण्यासाठीं नवे देश व खंड सांपडले. संपत्तीचीं हीं जीं नवीं साधनें उपलब्ध झालीं त्यामुळेंच खरोखर अनेक अडचणी निवारल्या गेल्या.

परंतु आतां आपल्या या जुन्या जगाचे प्रश्न सोडविण्यासाठीं, त्याचा तोल राखण्यासाठीं, नवें जग कांहीं निर्माण होणें किंवा उपलब्ध होणें शक्य नाहीं. आपलें नशीब आपणांला हात देईल अशा समजुतीनें त्यावर हवाला ठेवून चालणार नाहीं. जर लोकशाहीनिष्ठ स्वयंशासनाच्या तत्त्वांचा टिकाव लागायला हवा असेल, तर आपल्या प्रश्नांचा आपणच सांगोपांग विचार केला पाहिजे.

सध्यांच्या आपल्या अवस्थेचा विचार केला म्हणजे मला गेल्या महायुद्धांतल्या एका अमेरिकन सैनिकाची आठवण होते. जेव्हां जेव्हां या सैनिकाला निर्णय घेण्याचा प्रसंग येई तेव्हां तो अगदीं गर्भगळित होई. हें पाहून त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यानें त्याला बटाटे सोलण्याचें काम दिलें. लहान बटाटे एका टोपलींत टाकावयाचे व मोठे दुसऱ्या टोपलींत टाकावयाचे, असें त्याला सांगण्यांत आलें.

नंतर कांहीं वेळानें जेव्हां तो अधिकारी परत आला तेव्हां त्याला सैनिक हताशपणानें बटाट्यांकडे पहात असल्याचें दिसलें. अधिकाऱ्यानें विचारलें : " अरे ! काय, झालें काय ? तुला बटाटे सुद्धां सोलतां येत नाहींत कीं काय ? "

सैनिक म्हणाला, " तें अगदीं सोपें आहे. पण लहान बटाटे आणि मोठे बटाटे वेगळे करावयाचे आहेत ना ! ती निवड करतांना मला किती विचार करावा लागतो आहे, ह्याची तुम्हांला कल्पना यायची नाहीं. "

* ३ *

आपल्याला सोडवावयाचे प्रश्न हे लहान वा मोठ्या बटाट्यांएवढेच असते तर किती बरें झालें असतें ! पण वस्तुस्थिति अशी आहे कीं, आपल्याला अक्षरशः सतत आणि प्रत्येक गोष्टीबद्दल विचार करणें भाग आहे.

गेल्या युद्धापूर्वींपर्यंत आक्रमणाचा प्रतिबंध केव्हां व्हावयाचा, हें इतर राष्ट्रें ठरवीत असत. आतां हें ठरविण्याचें काम आपणांला, या देशाला करावें लागणार आहे.

आज आपली भूमिका बदललेली आहे. आज स्वतंत्र जगाचें वैचारिक नेतृत्वच अमेरिकेला करावें लागत आहे. अमेरिका ही वैचारिक केंद्रबिंदुच बनली आहे. इतकेंच नव्हे तर आपण युद्धांत गुंतलों नसल्यानें किंवा शांतताहि उपभोगीत नसल्यानें आपली स्थिति मोठी क्लेशदायक झाली आहे.

दिवस व रात्र यांत जसा फरक असतो, तसा आपल्या राजकीय आणि आर्थिक व्यवहाराबाबतच्या युद्धकाळांतल्या संवयी आणि शांतताकाळांतल्या संवयी यांत फरक आहे. युद्धासारखी आणीबाणीची परिस्थिति उद्भवली तर तिला तोंड देण्यासाठीं आपल्या राष्ट्राध्यक्षाला अमर्याद अधिकार आपली घटनाच देते; पण युद्ध संपल्यानंतर मात्र लोकसभेचा अधिकार पुन्हा मान्य करावा लागतो. परंतु आजचा हा संधिकाळ आहे; धड युद्धहि चालू नाहीं आणि खरी शांतता आहे असेंहि म्हणवत नाहीं. अशाच वेळीं आपले अध्यक्ष आणि कॉंग्रेस ह्यांचे संबंध कसे असावेत ?

तसेंच युद्धकाळांत व शांतताकाळांत मागणीपुरवठ्याची कार्यपद्धति सर्वस्वी भिन्न स्वरूपाची असते. तेव्हां शांततेच्या काळांतील मार्ग केव्हां सोडून द्यावयाचे आणि सुरक्षिततेचें अस्तित्व टिकविण्याचे मार्ग केव्हां हाताळावयाचे, हें आपणांस नक्की समजूं शकेल काय ?

जर या देशावर हल्ला झाला तरी आपली ही प्रचंड उत्पादनशक्ति शांततेच्या कामाकडून काढून युद्धकार्याकडे वळविण्याला थोडा का होईना पण कांहीं तरी अवधि लागेल. तेवढ्या त्या संधिकाळांत शत्रु आपला नाश करूं शकेल. आपलीं मालाचीं गुदामें भरलेलीं आहेत, पण आपलें युद्धसाहित्याचें कोठार मात्र टिकलें आहे, ही परिस्थिति जेवढा काळ राहील तेवढ्या काळांत आपल्यावर मात करावयाची एवढाच डाव खेळणें शत्रूला शक्य आहे.

शांततेच्या कामीं उपयोगांत येणारे उद्योगधंदे युद्धाच्या कामीं उपयोगांत आणण्यासाठीं फारसा विलंब लागणार नाहीं, अशा रीतीनें आपण आपल्या संरक्षणकार्याची आंखणी केली पाहिजे. विजेच्या चपळाईनें आपल्यावर

हल्ला करून शत्रूनें आपल्याला नष्ट करूं नये, यासाठीं निदान पुढील सात गोष्टी तरी आपण केल्या पाहिजेत.

( १ ) आपण वाटाघाटी व करार करून शांतता आणि सुरक्षितता स्थापन करण्याची धडपड मुळींच सोडतां कामा नये. यासाठीं आपण कोणत्या अटीं-वर तडजोड करण्यास तयार होऊं आणि कोणत्या तत्त्वासाठीं युद्धाला उभे राहूं, याचा आपल्याला पूर्णपणें विचार करावा लागेल.

( २ ) ताबडतोब शत्रूवर प्रहार करतां येईल इतकें सैन्य आपण आणि आपल्या दोस्त राष्ट्रांनीं बाळगलें पाहिजे. ह्याचा अर्थ असा कीं, हल्ला केला तरी ताबडतोब आपल्याला प्रतिकार होणार नाहीं असा भ्रम कोणाहि हल्ले-खोराला रहातां कामा नये.

( ३ ) शस्त्रसामग्री उत्पन्न करण्याच्या आपल्या शक्तीवर विसंबून न रहातां आपण हातांत आलेलीं शस्त्रें व राखीव शस्त्रसामर्थ्य यांवर पूर्वीपेक्षां अधिक भर दिला पाहिजे. यावर कांहींजण म्हणतात कीं, थोड्याच वर्षांत हीं शस्त्रें निरुपयोगी ठरतील. पण कोरियन युद्धाच्या पहिल्या दोन वर्षांत वापरलेलीं बहुतेक शस्त्रसामग्री दुसऱ्या महायुद्धांतून उरलेली होती. आपल्यावर हल्ला झाला तर त्यांतून डोकें वर काढण्याला आपल्या उद्योगधंद्यांना किती काळ लागेल हें कोणीं सांगावें ?

( ४ ) शांततास्थापनेसाठीं कोणते डावपेच टाकायचे, याचा विचार समग्र-पणें, सर्व आघाड्या लक्षांत घेऊन आणि प्रत्येक आघाडी ही जागतिक आघाडीचा एक भाग आहे हें ध्यानांत धरून आपण व आपल्या दोस्तांनीं केला पाहिजे. कोरियन युद्ध सुरू झालें तेव्हां मीं असा इशारा दिला होता कीं, जोंपर्यंत आपण व आपले आशियांतील आणि युरोपांतील सहकारी सज्ज होत नाहींत, तोंपर्यंत आशियांतील परिस्थिति थोपवून धरणें आपल्याला अशक्य आहे. पण पॉट्स्डॅम बैठकीपासून आपण जागतिक लढ्याचा हा प्रश्न हप्त्या-हप्त्यानें, तात्पुरते उपाय योजून सोडवीत आलों आहों. त्यामुळें परिस्थितींत एक प्रकारची अनिश्चितता आली आहे. अनिश्चिततेपेक्षांहि वाईट असें कांहीं तरी घडलें आहे.

(५) जागतिक राजकारणाचे डावपेच ठरविण्यासाठीं, स्वदेशांत व बाहेर योजावयाच्या उपायांमध्यें समतोल राखण्यासाठीं, सरकारनें स्वतःची अशी एक स्वतंत्र संघटना तयार केली पाहिजे. केवळ ह्या प्रश्नाचा विचार तिनें केला पाहिजे, तिनें दुसरें कांहीं करूं नये. नॅशनल सिक्युरिटी कौन्सिलनें या प्रकारचें कार्य करावें, अशी अपेक्षा होती; पण ही अपेक्षा त्याच्याकडून पुरी झाली नाहीं.

(६) शांततास्थापनेचें कार्य पार पाडण्यासाठीं आपण संघटित झालें पाहिजे. शांततेसाठीं कशाची गरज आहे, त्याचा तपशीलवार विचार झाला पाहिजे आणि विशिष्ट उद्देश स्पष्ट केले पाहिजेत. शांततास्थापनेच्या वेळापत्रकाची अंमलबजावणी करण्यासाठीं इतर सर्व गोष्टी दुय्यम मानल्या पाहिजेत. आपल्या सुरक्षिततेच्या दृष्टीनें प्रयत्नांची शिकस्त झाली पाहिजे. करांत कपात व्हावी म्हणून प्रयत्न होऊं नयेत, वा सोव्हिएत रशियाच्या धोरणासंबंधीं मनोराज्यें करीत स्वस्थ राहूं नये.

(७) आणखी एखादें युद्ध जर उद्भवलें तर त्या आणिबाणीच्या परिस्थितींत सरकारला जे अधिकार द्यावे लागतील, त्यासंबंधींचे कायदे आतांच करून ठेवावेत. अमेरिकेंत वसाहत करणाऱ्यानें ज्याप्रमाणें बंदूक हाताशीं ठेवून जमीन नांगरली, खणली, त्याप्रमाणें आपल्यालाहि करावें लागेल. आपला अर्थव्यवहार आपल्याला निर्बंधरहित ठेवतां येईल पण एका अटीवर. ती अट अशी कीं, आणिबाणीची वेळ येतांच क्षणार्धात आपण नांगर टाकून देऊन युद्धासाठीं बंदूक हातीं घेतली पाहिजे. युद्ध-परिस्थितीचे हे अधिकार आतांच वापरांत आणूं नयेत. पण त्या-संबंधींचे कायदे करून ठेवावेत म्हणजे वेळ येतांच ते लगोलग अंमलांत आणतां येतील.

अशा प्रकारचा युद्धसज्जताविषयक कायदा अगोदरच करून ठेवावा यासाठीं मी गेलीं ३० वर्षें सतत पण निष्फळ झगडत आलों आहें. कांहीं मित्रांनीं मला विचारलेंहि कीं, मी हें सोडून कां देत नाहीं? त्यावर मी उत्तर देत आलों आहें कीं, आपली संस्कृति जर टिकवावयाची असेल तर आपण ही लढाई जिंकलीच पाहिजे.

केवळ हा एवढा कायदाच पणाला लागलेला नाहीं. आपण ज्या जगांत वावरतों त्या-त्याविषयींचें आपलें ज्ञान आणि त्या जगाशीं जुळवून घेण्याची आपली ताकद यांचीच ही खरोखर कसोटी आहे.

१९४७ सालीं एका वृत्तपत्रांत आलेल्या बातमीचें एक कात्रण मीं कापलें आहें. आपल्यापुढें जें आवाहन आहे तें या बातमीच्या द्वारें फार चांगल्या प्रकारें स्पष्ट होतें. त्या वृत्तांत एका रशियन सेनाधिकाऱ्यानें अशी बढाई मिराविली होती कीं, पाश्चात्य लोकशाही राष्ट्रें लढाईसाठीं आवश्यक तो त्याग करणार नाहींत आणि म्हणून त्यांचा निश्चित पराभव होईल. हीं लोकशाही राष्ट्रें आपल्या राहणीच्या दर्जाला फार महत्त्व देतात आणि म्हणून नित्याच्या चैनीच्या वस्तूंचें उत्पादन बाजूला सारून शस्त्रोत्पादन करण्याला तयार होणार नाहींत. त्यासाठीं जीं नियंत्रणें घालून घ्यावीं लागतात, तीं ते घालून घेणार नाहींत.

या रशियन सेनाधिकाऱ्यानें अशीहि बढाई मारली होती कीं, रशियाला युद्धाला जो त्याग करावा लागेल, तो सोव्हिएत सरकार सक्तीनें लोकांना करायला लावील. हटकुळ्या, भुकेल्या पण संघटित लोकांचा रशिया पाश्चात्य जगावर मात करील. कारण तें वेळेवर युद्धाची तयारी करूं शकणार नाहीं.

जेव्हां जेव्हां आपल्याला शीतयुद्धांत विजय मिळाला, तेव्हां तेव्हां आपण आवश्यक तो त्याग केला म्हणून मिळाला आणि जेव्हां जेव्हां आपला पराभव झाला तेव्हां तेव्हां तो आपण आवश्यक तो त्याग न केल्यानें झाला.

हें सत्य टाळण्याचा आपण वारंवार प्रयत्न केला आहे. एखादें उत्कृष्ट भाषण केलें किंवा उच्च, उदात्त अशा ध्येयांचा उच्चार केला कीं परिणामकारक असें परराष्ट्रीय धोरण आपण आंखूं, अशाच आविर्भावानें आपण वागत आलों आहोंत. या शब्दावडंबरालाच कांहीं लोक परराष्ट्रीय धोरण म्हणतात. आणि त्या शब्दावडंबरामुळें कांहीं वेळां आपल्याला यश आलेंसें आपल्याला वाटतें. मग मध्येंच कोरियासारखें वा इंडोचीनसारखें एखादें प्रकरण उद्‌भवतें आणि शब्दावडंबराचा मुखवटा गळून पडतो आणि मनुष्यशक्ति व इतर साधन-सामग्री वापरण्याची आपली शक्ति म्हणजेच परराष्ट्रीय धोरण, त्यापेक्षां दुसरें कांहीं नाहीं, हें सिद्ध होतें.

आणि नेहमीं हें असेंच होणार. आपल्या धोरणाची पूर्ण अंमलबजावणी करण्यासाठीं कोणता आणि किती त्याग करण्याची आपली तयारी आहे, ह्या प्रश्नाच्या उत्तरावरच आपली कसोटी लागणार आहे आणि रशिया ही कसोटी आपल्याला लावणार, हें अगदीं स्पष्ट आहे.

सार्वत्रिक लष्करी शिक्षण किंवा सर्व साधनसामग्री युद्धदृष्टीनें संघटित करण्याची तयारी यामुळें ज्या स्वातंत्र्यासाठीं आपण लढतों आहोंत, त्या स्वातंत्र्यावर बंधन येतें. म्हणून जे लोक ह्या गोष्टींना विरोध करतात त्यांना शीतयुद्धाचें व सरकारचेंहि खरें स्वरूप आकलन झालें नाहीं, असेंच म्हटलें पाहिजे.

माणसाला खरोखर एकाच प्रकारचें स्वातंत्र्य केव्हांहि असूं शकतें आणि तें म्हणजे स्वतःला शिस्त लावून घेण्याचें, स्वयंनियंत्रणाचें. आपल्यावर विजय मिळवणाऱ्या शत्रूनें दडपशाही करून व गुलाम बनवून आपल्याला शिस्त लावण्यापेक्षां आपण होऊन स्वतःला शिस्त लावून घेण्याचा आपला हक्क टिकावा म्हणूनच आपण झगडत आहोंत.

तसेंच केवळ आपण अमेरिकन लोकांनींच हें सत्य जाणलें पाहिजे असें नाहीं. युरोपियन संरक्षणसंघटनेंत सामील झालेल्या आपल्या दोस्तांपुढेंहि हा प्रश्न आहे. सर्व युरोपची संघटना करून परिणामकारक असें संरक्षण निर्माण करण्यासाठीं समान शिस्त लावून घ्यावयाची कीं जे लोक आपल्या सज्जतेच्या अभावाचा फायदा घेऊन युरोप पादाक्रांत करतील आणि त्याला कडक व दीर्घकाळ टिकणारी शिस्त लावतील त्यांच्या आक्रमणाला वाव द्यावयाचा, असा प्रश्न आहे.

आशियांतील वा इतर खंडांतील नव्यानें स्थापन झालेल्या सरकारांपुढेंहि हाच प्रश्न आहे. जेव्हां या राष्ट्रांतील लोक साम्राज्याचे परतंत्र नागरिक होते, तेव्हां स्वतःची मुक्तता करून घेणें, स्वतंत्र होणें, एवढाच एक विचार ते प्रामुख्यानें करीत. या त्यांच्या आकांक्षेबद्दल मला पूर्ण सहानुभूति आहे.

पण आतां हे लोक स्वतंत्र झाले आहेत.

जुनी व्यवस्था नष्ट झाली. आतां तिच्या जागीं कोणती व्यवस्था स्थापन करावयाची? हा प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न करीत असतांनाच ह्या लोकांना हें

कळून चुकलें आहे कीं, केवळ राजकीय स्वातंत्र्य मिळवणें म्हणजेच खरें स्वयंशासित बनणें नव्हे. अमेरिकेच्या एका थोर विचारवंतानें, वुड्रो विल्सन यानें, सांगितलेलें सत्य या लोकांना जाणवूं लागलें आहे. त्यानें म्हटलें होतें: "स्वातंत्र्य म्हणजेच सरकार किंवा शासनसत्ता नव्हे. भलत्यांच्या हातीं तें गेलें, ज्या हातांना संवय नाहीं व शिस्त नाहीं त्या हातांत तें गेलें, तर स्वातंत्र्य व व सरकार यांत सुसंवाद रहात नाहीं."

जीवनावश्यक वस्तूंचें उत्पादन आणि त्यांचें वांटप यासंबंधींचा प्रश्न सोडविण्याला या देशांना कांहीं काळ घालवावा लागेल. स्वयंशासित सरकारची शिस्त व हातोटी आत्मसात् करण्यास या लोकांना वेळ लागेल. या लोकांना हा अवधि मिळेल अशा रीतीनें त्यांना मदत करण्याचे परिणामकारक उपाय आपण अवलंबिले पाहिजेत. म्हणजे जें स्वतंत्र सरकार त्यांना लाभलें आहे, तें नष्ट होण्याचा प्रसंग येणार नाहीं.

सोव्हिएत व्यवस्थेंत स्वतंत्र सरकारवर विश्वास नसतो. त्याची गरजहि नसते. लोकांना आपले व्यवहार सांभाळण्याचें स्वातंत्र्य देण्यावर कम्युनिस्टांचा विश्वास नाहीं. हा पंथ उघडपणें असें सांगतो कीं, एका मिरासदार गटानें सर्व व्यवहार आपल्या हातीं घेऊन लोकांवर हक्क गाजविला पाहिजे. हा गट कोणीं निवडलेला नसतो, तर स्वयंभू असतो व सर्व प्रश्नांचीं उत्तरें आपल्याला सांपडलेलीं आहेत, असा त्याचा दावा असतो. आपली ही व्यवस्था पसरविण्यासाठीं लोकांची स्वयंशासनाची शक्ति खच्ची करण्याचा मार्ग रशिया पत्करतो किंवा नवा परकीय शास्ता पत्करण्याची रशिया या लोकांना सुरळ घालतो.

ज्यांना स्वतंत्र होण्याची किंवा रहाण्याची इच्छा आहे, त्यांनीं आपण स्वतःला शिस्त लावून घेऊं शकतों, आपण स्वयंशासन अंमलांत आणूं शकतों, हें सिद्ध केलें पाहिजे. सरकारपुढें आज जो पेंचप्रसंग आहे, त्याचें स्वरूप हें अशा प्रकारचें आहे.

तेव्हां खरी कसोटी श्रद्धेची नसून कार्यांची आहे. आपली स्वयंशासित सरकारवर श्रद्धा आहे असें नुसतें सांगून भागणार नाहीं. तर आपल्या

प्रश्नांचा सांगोपांग विचार करून आणि जे उपाय योजावे लागतील त्यांसाठीं स्वतःला शिस्त लावून घेऊन आपण स्वतंत्रपणें कारभार हाकूं शकतों, हें सिद्ध केलें पाहिजे.

विचार! व शिस्त!!

मानवाच्या स्वयंशासनासाठीं जो प्रदीर्घ झगडा चालू आहे, त्याकरितां या दोन शस्त्रांवर आपण विश्वास ठेवणें जरूर आहे. जर ह्या लढ्यांत पराभव पत्करावा लागला तर स्वयंशासनाचें ध्येय अस्तंगत होईल. आणि सर्व जग गुलामगिरीच्या तमोयुगांतून गेल्याखेरीज पुन्हा या ध्येयाचा तारा उदयाला येणार नाहीं.

सारांश, मानवाच्या स्वयंशासनाच्या पात्रतेसंबंधांत आपण एक तर निकराचे प्रयत्न केले पाहिजेत किंवा मूग गिळून स्वस्थ तरी बसलें पाहिजे.

* ४ *

आपली सर्व संस्कृति रसातळाला जाण्याचा धोका उत्पन्न झालेला आहे व त्यापासून मुक्त होण्याची आकांक्षा हीच आपल्या काळांतील प्रमुख आकांक्षा आहे. ह्यावर मीं मुख्यतः भर दिला आहे. मीं असेंहि सांगितलें कीं, या संस्कृतीला स्थैर्य प्राप्त व्हावयाचें असेल तर आपण आपल्यांतच स्थैर्य कसें निर्माण होईल हें पाहिलें पाहिजे. आपण स्वयंशासनास लायक आहोंत, हें सिद्ध करण्याची कसोटीची वेळ इतिहासांत आतां आली आहे, असें मला सांगावयाचें होतें.

हें स्थैर्य साधण्यासाठीं आपण मूक शरणागति किंवा आंधळी बंडखोरी हीं दोन्ही टोकें सोडून शिस्तबद्ध विचारानें आपला मार्ग आंखला पाहिजे, असेंहि मत मीं व्यक्त केलें.

स्वतःला शिस्त लावून घेण्याची गुरुकिल्ली यांत आहे, स्वयंशासित सरकारची गुरुकिल्लीहि तीच आहे, आणि सतत प्रगतीचा मार्गहि तोच आहे.

वास्तविक पाहिलें तर स्वतःला स्वतः शिस्त लावणें, स्वयंशासित सरकार व सतत प्रगति हे एका वस्तूचेच वेगवेगळे घटक आहेत.

आपल्यापुढें ज्या अनेक अडचणी आहेत त्यांवरच साहजिकपणें माझे विचार केंद्रित झाले आहेत. या प्रश्नांचें वास्तव चित्रण करीत असतांना तें सोडविणें मानवाच्या शक्तीबाहेरचें आहे ही भावना मीं निर्माण केली नाहीं, अशी मला आशा वाटते. आपल्या स्वतःविषयींचें अधिक सम्यक् ज्ञान आणि आपल्या समाजाचे नियम व शक्ति यांचें ज्ञान यांवरच स्वयंशासित सरकार अधिष्ठित आहे व तें आपल्या हातांतलें एक उत्तम हत्यार आहे. ह्या हत्याराच्या साहाय्यानें अडचणींवर विजय मिळवणें आपल्याला शक्य आहे. भविष्यकाळ तुमचा आहे. भूतकाळांतील मानवी अनुभवांतूनच मानसिक शिस्त निर्माण होते व सद्यःकालीन प्रश्न सोडवितां येतात. माझें भाषण हें प्रस्तुत मार्ग स्वीकारण्यास तुम्हांला साहाय्यभूत होईल, अशी अपेक्षा आहे.

* * *

# जिवंत असलेली अस्मिता

न्यूयॉर्कच्या सिटी कॉलेजनें आपल्या स्कूल ऑफ बिझिनेस अॅण्ड पब्लिक अॅडमिनिस्ट्रेशनला माझ्या ह्यातींत माझें नांव दिलें याबद्दल मीं कोणत्या शब्दांत माझ्या भावना व्यक्त कराव्या, तेंच मला कळत नाहीं. माझ्या ह्या सन्मानानें मी खरोखर भारावून गेलों आहें. ज्या शहरांत मी वाढलों व जवळजवळ ७५ वर्षें घालविलीं, त्याच शहराच्या नागरिकांकडून माझा हा सन्मान व्हावा, हें मला अधिकच संतोषजनक वाटत आहे.

इतर कॉलेजांच्या तुलनेनें विचार केला तर हें 'स्कूल' कांहीं मोठें भव्य वाटणार नाहीं. तुमच्याजवळ भरपूर निधीहि नाहीं. तुमच्या इमारतीच्या आसपास कचेऱ्यांच्या मोठमोठ्या इमारती असल्यानें कॉलेजची इमारत मागें पडते. तुमच्या इमारतीभोवतीं मोठें आवार आहे असेंहि नाहीं. तुमचें आवार म्हणजे रस्त्यावरचा फूटपाथ.

परंतु यांपैकीं एकहि गोष्ट या संस्थेचे गुण वा महत्त्व ह्यांची गमक होऊं शकत नाहीं. शिक्षक वर्गाच्या व विद्यार्थीवर्गाच्या दर्जावरूनच कोणत्याहि शिक्षणसंस्थेची योग्यता ठरते. त्या दृष्टीनें पाहिलें तर ह्या कॉलेजमधील शिक्षणाचा दर्जा जेवढा मोठा आहे तेवढा या देशांत इतरत्र क्वचितच असेल.

ही संस्था लहानशी वाटेल. पण अमेरिकनांचें स्वप्न साकार करण्यांत इतर नांवाजलेल्या कॉलेजांपेक्षां वा विद्यापीठांपेक्षाहि हीच संस्था पुढें आहे.

या संस्थेचें यथायोग्य मूल्यमापन करायचें झालें तर सीमा प्रांतांत जीं पहिलीं कॉलेजें स्थापन झालीं, त्यांचा विचार केला पाहिजे. फ्रेडरिक टर्नरनें लिहिल्याप्रमाणें ह्या सीमाप्रांतांत अनेक देशांतले लोक एकमेकांत मिसळले व एक नवा वंश तयार झाला. त्या वेळेला घरें बांधण्यासाठीं माफक दरानें मिळालेल्या जमिनी ही समता निर्माण करणारी एक मोठी शक्ति होती. पण प्रत्येक नव्या पिढीला आपल्या आईवडिलांनीं केलेल्या प्रगतीपेक्षां अधिक प्रगति करण्याची संधि देणारी सार्वजनिक शिक्षणाची पद्धति ह्या भागांत

८८६४

चालू होती. म्हणूनच जन्मजात दास्यवृत्ति व वर्गभेद यांच्यापासून मुक्त असा समाज निर्माण करण्याचें कार्य या भागांत होऊं शकलें, केवळ माफक दरांत जमिनी मिळाल्यामुळें हें झालेलें नाहीं.

मोफत मिळणाऱ्या जमिनी संपल्यानंतर परदेशांतून येणारे लोक मोठ्या प्रमाणावर आपल्या शहरांतून स्थायिक होऊं लागले. आपल्या शहरांत पश्चिमेकडील सीमा-प्रांतांप्रमाणेंच अनेक देशांचे व वंशांचे लोक एकत्र येऊन एक नवा समाज तयार होत आहे. ज्या समाजांत प्रत्येक माणसाला त्याच्या गुणावगुणांप्रमाणें दर्जा मिळूं शकतो, असा समाज निर्माण करण्याची पूर्वी-सारखीच धडपड आज इथें चालू आहे.

जीवनांत नव्या दिशेनें वाटचाल करण्याची संधि मिळणें हेंच आपल्या इतिहासांत सीमाप्रांताचें वैशिष्ट्य होतें. यासारख्या कॉलेजांचेंहि हेंच वैशिष्ट्य आहे. आपलीं अनेक विद्यापीठें मोठीं भव्य आहेत पण तुमचे विद्यार्थी येथें आहेत यामुळेंच या संस्थेचें महत्त्व अधिक आहे. या संस्थेंत विद्यार्थी आहेत याचवरून अमेरिकेच्या इतिहासांतली सीमाप्रांताची अस्मिता जिवंत आहे हें सिद्ध होतें.

या शहरानें वारंवार नवीन नवीन लोकांना आकर्षित केलें आहे, असें मला ह्या शहराचा जो इतिहास आठवतो, त्यावरून म्हणतां येईल. जितक्या वेगानें एक पिढी शिकून खरी अमेरिकन बनते त्याच वेगानें दुसरी पिढी तिची जागा घेण्यासाठीं येते. या विविध प्रकारच्या लोकांना एकत्र आणण्याचें जें उत्कृष्ट कार्य आपल्या शिक्षणसंस्थांनीं केलें आहे, त्याकडे आपणां सर्वांनीं दुर्लक्ष केलें आहे.

इतर देशांनीं परकी लोकांना आत्मसात् करण्याचा प्रयत्न केला पण तो फसला. त्यांचा प्रयत्न फसला याचें कारण हें कीं, सर्वांना एकाच सांचांत दाबण्याचा प्रयोग त्यांनीं केला. लोकांना प्रगतीची अधिक संधि देणें म्हणजेच खरोखर अमेरिकन करणें अशी पद्धत आपण रूढ केली व म्हणून आपण यशस्वी झालों. प्रत्येकाला वरती चढण्याची संधि आपण दिली. इतर कांहीं देशांप्रमाणें सर्वांना खालीं ओढून समता स्थापन करण्याचा उद्योग आपण केला नाहीं.

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वकम
नं. ८८६४ दि. ...

सर्वांना खालच्या पातळीवर आणण्यापेक्षां त्यांना विकासाची संधि देऊन समता स्थापन करावी, ही आपली जीवननिष्ठा आहे. या निष्ठेंतील सुज्ञपणा जगाला दाखविण्याच्या दिशेनें ही संस्था कार्य करील अशी मला उमेद वाटते.

सर्वांना सारख्या प्रमाणांत सुखी करण्यांत कोणतेंच सरकार यशस्वी झालेलें नाहीं. पण सर्वांना सारखेंच दुःखी करण्यांत मात्र अनेक सरकारें यशस्वी झालीं आहेत.

आपल्या ह्या संस्थेसारख्या संस्थांमध्यें अमेरिकेला प्रिय असलेल्या गुणांची आणि प्रवृत्तींची कशी जोपासना केली जाते, हें लोकांना अधिकाधिक जाणवूं लागेल, अशी मला आशा आहे. जगांतील एका अत्यंत मोठ्या उद्योगधंद्याचे प्रमुख आल्फ्रेड पी. स्लोन हे आज येथें आहेत, ही फार आनंदाची गोष्ट आहे. आधुनिक उद्योगधंद्यांच्या क्षेत्रांतील ते एक आद्य पुरुष आहेत आणि शिक्षण, वैद्यक व शास्त्रीय संशोधन या क्षेत्रांतहि ते धाडस व उद्योगशीलता आणीत आहेत; नवी दृष्टि देत आहेत. त्यांच्याप्रमाणेंच इतरहि उद्योगपति व सार्वजनिक नेते येथें येऊन आपल्या अनुभवांचा व विचारांचा फायदा विद्यार्थ्यांना देतील आणि त्या मोबदल्यांत त्यांनाहि विद्यार्थ्यांच्या गुणांची अधिक चांगली कल्पना येईल, अशी मला उमेद वाटते.

खाजगी कॉलेजच्या पदवीधरांना जी संधि मिळते तशी संधि यासारख्या सार्वजनिक कॉलेजांच्या पदवीधरांनाहि मिळाली पाहिजे, अशी जाणीव अशा प्रकारच्या देवाणघेवाणीनेंच या उद्योगपतींच्या ठिकाणीं निर्माण होईल. राष्ट्रीय जीवनांत उद्योगधंदे व राज्यकारभार यांचें जें स्थान आहे, त्याबद्दल विद्यार्थ्यांनाहि अधिक चांगली जाणीव या देवाणघेवाणीमुळें निर्माण होईल.

सरकार व उद्योगधंदे यांचें वैर आहे, असें कित्येकांना वाटतें. हा समज एका चुकीच्या कल्पनेंतून निर्माण झाला आहे व तो गेल्या मंदीनें वाढविला आहे. व्यापारांत नफा मिळविणें, हें अनैतिक आहे इतकेंच नव्हे तर दुष्टपणाचें आहे, अशी त्यांची कल्पना असते.

पण नफ्याची ही कल्पना कशी आली आणि मान्यता पावली, ह्याचा इतिहास जर आपण तपासला तर असें दिसेल कीं, ही कल्पना एका ध्येयवादांतून निर्माण झाली आणि स्वातंत्र्यानें ती वाढविली.

प्रत्येकाला आपला उद्योगधंदा करून जो कांहीं नफा मिळण्यासारखा असेल तो मिळवण्याची संधि दिली तर एकंदर समाजच संपन्न होईल, अशी श्रद्धा यामागें होती. आणि नैसर्गिक व्यवस्थेंत मूलतः दोष नसून ती चांगली आहे, या मूळ श्रद्धेचेंच ही श्रद्धा म्हणजे एक प्रतिबिंब होती. जगांतील सर्व परस्परविरोधी शक्ति जर मुक्त ठेवल्या तर त्यांच्या परस्परविरोधांतून एक प्रकारचा समतोल निर्माण होईल आणि तो कोणत्याहि सरकारच्या हुकुमापेक्षां समाजाचें हित करण्याला अधिक समर्थ होईल, अशी कल्पना होती.

परंतु मानवाचा लोभ आणि दुःख हीं दोन्ही आपण स्वतःहून आपले दोष सुधारीत नाहींत, हें आपल्याला आतां कळून चुकलें आहे. कांहीं व्यक्ति वा गट यांच्या नफेबाजीमुळें समाजाचा फायदा होण्याऐवजीं बरेंचसें नुकसानच झालें आहे, हें आपण पाहिलें आहे.

पण खाजगी नफा आणि समाजाचें हित ह्यांत खूप तीव्र आणि व्यापक विरोध आहे, अशी आपली समजूत करून देण्याचा कांहीं लोक प्रयत्न करतात. खरोखर तो तसा आहे का ?

मानवाच्या श्रमांतून कांहीं फायदा झाला म्हणजे त्यानें जेवढें गुंतविलें असेल त्यापेक्षां त्याच्या हातीं अधिक कांहीं पडलें तरच समाजाला व प्रत्येक व्यक्तीला भौतिक प्रगति करण्याचें साधन उपलब्ध होईल. नुकसान सोसून उत्पादन केलें तर वांटणी करून घेण्याला फारच थोडें शिल्लक राहील. मला तुम्ही वाटेल तर जुनाट म्हणा, पण फायदा मिळवून न देणाऱ्या उद्योगधंद्यांपेक्षां फायदेशीर उद्योगधंद्यामुळेंच नागरिक सत्प्रवृत्ति अंगीं बाणतात असें मला वाटतें.

मानवांनीं केलेल्या उद्योगधंद्यांतून मिळणाऱ्या फायद्याची वांटणी अनेकदां अन्याय्य व मूर्खपणानें होत असते, हें खरें आहे. पण नफा नष्ट केल्यानें ह्या दोषांचें निर्मूलन होईल असें नाहीं.

आणि नफ्याच्या ह्या पद्धतीला दुसरे कांहीं पर्याय काय आहेत? लोकांना प्रोत्साहन मिळण्यासाठीं त्याऐवजीं दुसरें काय देतां येईल?

आपल्या श्रमांविषयीं प्रेम वा दुसऱ्यांच्या उपयोगीं पडण्याची बुद्धि हे पर्याय आहेत. कांहीं लोकांना वैयक्तिक फायद्यापेक्षां अशा प्रकारचें ध्येय समोर ठेवून वागण्यांत आनंद वाटतोहि. पण आतांपर्यंत या ध्येयाच्या आधारावर कोणताहि समाज फार काळ उभा राहूं शकला नाहीं, हा अनुभव आहे.

नफ्याखेरीज दुसरा एक पर्याय आहे व तो म्हणजे उच्च अधिकारावर आरूढ झालेल्यांच्या हुकुमावरून लोकांना सक्तीनें काम करावयास लावणें. जेव्हां जेव्हां या पर्यायाचा अवलंब करण्यांत आला तेव्हां तेव्हां थोड्याबहुत प्रमाणांत तरी लोकांचें स्वातंत्र्य गमावलेलें आहे. कांहीं वेळां तर लोक यामुळें गुलामच बनले आहेत.

नफ्याच्या पद्धतींत व्यक्तीला प्रोत्साहन मिळतें. त्याचें अधिष्ठान दडपशाही हें नाहीं. या दृष्टीनें पाहिलें तर वैयक्तिक स्वातंत्र्य टिकविण्यासाठीं तें एक महत्त्वाचें साधन आहे.

सरकारच्या अतिरिक्त अधिकाराविरुद्ध केलेल्या बंडांतून नफ्याची ही पद्धत निर्माण झाली. हा कांहीं केवळ योगायोग नव्हे आणि त्याचप्रमाणें केव्हांहि नव्हतें इतकें ह्या नफापद्धतीबरोबरच वैयक्तिक स्वातंत्र्य अनुभवाला मिळालें हाहि योगायोग नव्हे.

नफा मिळविण्याच्या या पद्धतीचा जो गैरवाजवी उपयोग होतो, त्याला निर्बंध घालूं नयेत असें मला वाटत नाहीं. पण ही पद्धत सामाजिक व्यवहारांतलें एक चांगलें हत्यार ठरली आहे व तें हत्यार त्याचा दुरुपयोग केला जातो एवढ्या कारणासाठीं फेकून देणें इष्ट नव्हे. त्याच्या गैरवाजवी उपयोगाला आळा घालून त्यामुळें होणारे भौतिक व आध्यात्मिक लाभ मिळविण्याचें कार्य चालू ठेवणें शक्य आहे आणि तिच्यासाठीं सक्ती करावी लागत नाहीं. अशी ही पद्धति टिकविणेंहि आपल्या हातीं आहे.

* ३ *

अशा स्थितींत कोणता मार्ग स्वीकारणें योग्य होईल ? कोणत्याहि प्रकारें हस्तक्षेप न करणारें सरकार असणें हा तो मार्ग आहे, असें मला वाटत नाहीं. तसेंच सरकारनें प्रत्येक गोष्टीचें नियमन करणें हाहि मार्ग योग्य होणार नाहीं.

सरकारी मिरासदारीचा इतिहास अगदीं पहिला राजा राज्यारुढ झाला तेव्हांपासून पाहिला तरी असें दिसेल कीं, ती खाजगी मिरासदारीप्रमाणेंच मानवाचे हक्क व प्रतिष्ठा यांना मारक ठरली आहे. कोणत्याहि प्रकारची आर्थिक मिरासदारी मी त्याज्य समजतों.

जर आपणांला आपलें स्वातंत्र्य टिकवूनहि आपले आर्थिक प्रश्न सोडवावयाचे असतील तर आपल्या राष्ट्राच्या संस्थापकांच्या राजकीय समंजसपणाचा उपयोग आपण आर्थिक जीवनांतहि करून घेतला पाहिजे. ज्यांनीं अमेरिकेची राज्यघटना लिहावयास घेतली त्यांनीं इतिहासाचा अभ्यास करून असें ठरविलें कीं, मालमत्ता आणि वैयक्तिक स्वातंत्र्य यांचें योग्य संरक्षण व्हायला हवें असेल तर सत्ताविभाजनाच्या तत्त्वावर सरकारची स्थापना झाली पाहिजे.

आर्थिक जीवनांतहि असेंच होण्याची गरज आहे. आर्थिक सत्तेचें विभाजन करून कमाल मर्यादेपर्यंत स्वातंत्र्य दिलें पाहिजे आणि सरकार यापासून जसें अलिप्त हवें तसेंच ज्यांच्या हातीं आर्थिक सत्ता असेल त्यांच्यावर त्याचा अधिकार असावा.

अशा प्रकारच्या व्यवस्थेंत उणीवा राहतील, अकार्यक्षमता व हेळसांडहि दिसेल; पण मानवाचा इतिहास आपणांस हेंच शिकवितो कीं, कोणतेंहि बंधन घालून न घेतां अमर्याद सत्ता वापरण्याचें कौशल्य कोणाच्याहि अंगीं नाहीं.

उद्योगधंद्यांचा कारभार आणि सरकारी कारभार ह्याचें शिक्षण देणारी ही संस्था आहे, हें मी एक सुचिन्ह समजतों. व्यापार व राज्यकारभार हीं परस्परावलंबी आहेत आणि म्हणून या दोन्ही विषयांचें शिक्षण एकाच ठिकाणीं एकाच वेळीं देणें युक्तच आहे. पण त्यांच्या समाईक आणि समान जबाबदाऱ्यांचा विचार करतांना आर्थिक क्षेत्रांत सत्तेचें विकेंद्रीकरण करण्याची पार्श्वभूमि सतत लक्षांत ठेवली पाहिजे.

सत्तेचें विभाजन करून व्यापार-व्यवहार आणि राज्यशासन यां[illegible] जबाबदारी ही संयुक्त स्वरूपाची आहे आणि तिची अंमलबजावण[illegible] सत्ताविभाजनाच्या चौकटींत होणें अशक्य आहे, असा विचार प्रस्तु[illegible] करणें हा या संस्थेचा उद्देश म्हणतां येईल.

व्यापारव्यवहार व राज्यशासन हे दोन्ही विषय शिकविणारी ही संस्था आहे, याकडे विद्यार्थ्यांच्या दृष्टीनें पाहिलें तर हे दोन्ही विषय आपल्या संस्कृतीच्या संवर्धनासाठीं किती महत्त्वाचे आहेत, तें त्यांना कळेल. समृद्धीच्या मार्गानें जाणाऱ्या राष्ट्रांमध्यें ज्यांना राज्यकारभार म्हणजे काय हें समजतें व म्हणूनच जे सर्वांना हितकारक होईल अशा रीतीनें सरकारी राज्यकारभार चालवतील असे लोक असणें आवश्यक असतें. त्याचप्रमाणें या सरकारच्या आधिपत्याखालीं रहाणाऱ्या लोकांचें भरणपोषण करण्यासाठीं आवश्यक त्या वस्तु निर्माण करणें व त्यांचें वाटप करणें हें ज्यांना चांगल्या रीतीनें माहिती आहे असेहि लोक हवेत.

या दोन्ही क्षेत्रांतील कौशल्य आपल्या या देशांत सर्वांत चांगल्या प्रकारें एकत्र आलेलें दिसतें. हें निर्दोष नसेल पण मानवी इतिहासांत इतपतहि तें कधीं दिसलें नाहीं. जिला माझें नांव मिळणार आहे अशी ही तुमची संस्था ही परंपरा चालविणार आहे, त्यामुळें मला सानंद अभिमान वाटतो.

* * *

REFBK-0008869

मराठा ग्रंथ [illegible]
अनुक्रम ७-३०८ दि: ...
क्रमांक २०६४ ...

## सुखाची सुरुवात

लेखक : **जॅक शॉफर**

अनुवादक : **स. गं. मालशे**

ापल्या आगळ्या अनुभूतींचें दर्शन घडवून ाचकाकडून सहानुभूतीची पावती कशी मळवावी, हें 'सुखाची सुरुवात'च्या लेखकाचें मुख वैशिष्ट्य आहे. ग्रामीण पार्श्वभूमींतून सरशीत आणि चटका लावणारीं व्यक्तिचित्रें शीं उभीं करतां येतात, त्याचा प्रस्तुत कथासंग्रह नमुना आहे.

मूल्य दोन रुपये.

## सोन्याची बेडी

लेखक : **व्हलॅडिमीर पेत्रोव**

अनुवादक : **श्याम गुप्ते**

दिशाळेंतील छळाची ही करुण कहाणी आहे. ट्टल गुन्हेगारांपासून सज्जन राजबंद्यांपर्यंत विविध तींचे जिवंत नमुने चितारल्यानें ती अतिशय चत्तवेधक आणि रोमांचकारी झाली आहे.

मूल्य अडीच रुपये.

## सगळं सगळं ठीक होतं

लेखक : **कॅथ्रीन फोर्बस**

अनुवादक : **भा. रा. भागवत**

ग्रजी भाषेंतील एक अमर कलाकृति. भा. रा. ागवतांचा खेळकर अनुवाद. कौटुंबिक व्हाळ्याची सुरस कथा.

मूल्य अडीच रुपये.

---

**जेस्टिक बुक स्टॉल**

**रगांव नाका, मुंबई ४**